RNI NO. MAHMAR/2020/84035

Sachin Sir's English Speaking
Its 100% guaranteed course
सबसे आसान तरीकेसे
अंग्रेजी बोलना
सिखानेके लियेही
हम जाने जाते है।
9028851719

BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

उपलब्ध आहे!
मिस्त्री, टाइल्स फिटर, पेंटर, कारपेंटर, प्लंबर इत्यादीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.
संपर्क मो. 8482839451



शुक्रवार, २६ डिसेंबर २०२५ | वर्ष : ६ | अंक : ०१ | दैनिक | किंमत : ₹५/-
Friday, 26 December 2025 | Year : 6 | Issue : 01 | Daily | Rate: Rs. 5/-

# मनुस्मृती दहन दिनी दैनिक बहुजन सौरभचा वर्धापनदिन भरगच्च उपस्थितीत साजरा



**नागपूर :** दैनिक बहुजन सौरभची मागील पाच वर्षाची वाटचाल संघर्षमय असली तरी भूमिका स्पष्ट आहे. बहुजन सौरभमध्ये प्रकाशित साहित्य हे आंबेडकरी समाजाला हितकारक कसे राहील याची दक्षता घेतली जाते. अन्य वृत्तपत्रात समाजात द्वेष पसरणाऱ्या घटनांचा उल्लेख असतो परंतु बहुजन सौरभमध्ये भांडणे लावण्याच्या बातम्या कधीच प्रकाशित केल्या जात नाही. अर्थात बहुजन सौरभ मध्ये सकारात्मक घटनांना महत्व दिले जाते. धम्मसंगोष्टीच्या सभासदांची समाजाप्रती असलेली जागृतता, आपुलकी आणि कर्तव्यदक्षता आजच्या कार्यक्रमातून आणि दान पारमितेच्या माध्यमातून दिसून आली. डॉ. बाबासाहेबांनी घडवून आणलेले मनुस्मृती दहन हा मानवतावाद, माणसामाणसातील भेद नष्ट करणारा होता. आज आंबेडकरी समाज दुभंगला आहे. मनुस्मृती दहन दिनाचे महत्व लक्षात घेऊन आम्ही एकत्रितपणे कार्य केले पाहिजे. दरवर्षी मनुस्मृती दहनाचे कार्यक्रम प्रत्येक बौद्ध विहारात मोठ्या घडवून आणले पाहिजे. असे धम्मसंगोष्टीच्या 374 व्या सभेचे प्रमुख वक्ते ॲड. डॉ. सिद्धार्थ कांबडे यांनी विचार व्यक्त केले. भंदत नाग दिपंकर यांनी महरापुरूषांना पुष्प कअर्पण करून अभिवादन केले.

'धम्मसंगोष्टी' ने आठ वर्षे पूर्ण झाले असून नवव्या वर्षात पदार्पण केले आहे. 'दैनिक बहुजन सौरभ' ने सुद्धा आपले पाच वर्षे पूर्ण करून सहाव्या वर्षाकडे वाटचाल सुरू केली आहे. मनुस्मृती, मनूचा मासा आणि डॉ. बाबासाहेबांचे विचार वाचले आणि माझ्या आयुष्यात प्रचंड परिवर्तन घडून आले. मनुस्मृती दहनमुळे भारतातील समस्त महिला दास्यातून मुक्त झाल्या. आज अनेक महिलांच्या जीवनात डॉ. बाबासाहेबांच्या विचारांमुळे बदल घडून आलेत. त्या किटीपार्टी सुद्धा बुद्ध वंदना घेऊन सुरू करत आहेत. निवासी संपादकाची जबाबदारी मी प्रामाणिकपणे पार पाडण्याचा प्रयत्न करत आहे. रोज प्रासंगिक विषयांवर अग्रलेख लिहून समाजाला नवीन काय द्यायचे हे कार्य मागील पाच वर्षापासून कार्य करत आहे. आम्ही सात राज्यस्तरीय साहित्य सम्मेलन आयोजित केले. त्यातून युवकांचे समाजप्रबोधनाचे कार्य करण्याचे प्रयत्न आहे. तरुण पिढी बहुजन सौरभशी जुळली पाहिजे, तरुण लेखक निर्माण झाले पाहिजे. आंबेडकरी समाजाची लोकसंख्या विचारात घेता मागील पाच वर्षात पाचशे भागधारक झाले पाहिजे होते. मोठ्या संख्येने बहुजन सौरभचे वाचक तयार झाले पाहिजे. असे बहुजन सौरभचे संपादक संध्या राजुरकर यांनी धम्मसंगोष्टी सभेला संबोधित करतांना विचार व्यक्त केले.

मनुस्मृती दहन हा ऐतिहासिक दिवस चिरंतर आठवणीचा आहे. आम्ही कसे होतो आणि आज कसे आहोत, हे मनुस्मृती दहन सारख्या चळवळीतून समाज परिवर्तीत होत गेला आहे. बहुजन सौरभहे आंबेडकरी समाजाला नव्या दिशा दाखवत आहे, नवीन आशा घेऊन येत आहे, आमचा विवेक जागृत करत आहे. अर्थात बहुजन सौरभचे कार्य अत्यंत जिव्हाळ्याचे तसेच समाजाला दिशादर्शक आहे. त्यामुळे धम्मसंगोष्टीच्या माध्यमातून बहुजन सौरभच्या वाटचालीस हातभार लावण्याचे आम्ही प्रयत्न करत आहोत, असे प्रा. घनशाम धावडे यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणातून विचार व्यक्त केले. धम्मसंगोष्टीच्या प्रयत्नातून बहुजन सौरभ ला जवळपास 14 भागधारक मिळाले आहेत. धम्मसंगोष्टीने जवळपास सहा महीने 'घर घर बहुजन सौरभ' हे अभियान चालवले आहे, या प्रेरणादायी कार्यामुळे आंबेडकरी समाजात बहुजन सौरभ विषयी जागृती निर्माण झाली आहे. मनुस्मृती दहन दिन आणि बहुजन सौरभच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून धम्मसंगोष्टीचे सक्रिय सदस्य यु. पी. कांबळे, रमेश धनमोडे यांनी आर्थिक सहाय्य करुन बहुजन सौरभचे भागधारक बनले. धम्मसंगोष्टीचे कार्यकर्ते सिद्धार्थ कांबळे (मिहान) यांनी, प्रेमनाथ डोंगरे , प्रेमलाल रंगारी , साधना शुद्धोदन बडवणे आर्थिक सहाय्य केले. याशिवाय प्रेमालाल रंगारी यांनी वज्रासनच्या मुलींना 5 हजार रुपयाचे आर्थिक सहाय्य केले. बबन चहांदे, रत्नघोष सोनपिंपळे यांनी बहुजन सौरभ ला आर्थिक सहाय्य करण्याचे अभिवचन दिले. या सर्वांचे कार्यकारी संपादक विलास गजभिये यांनी आभार व्यक्त केले. या प्रसंगी धम्मसंगोष्टीचे भागधारक श्रीराम बनसोड, एस.टी. चव्हाण, नरेश धोपटे, प्रा. घनशाम धाबर्डे, प्रा. यशवंत दुपटे, नरेंद्र ताकसांडे, यू.पी. कांबळे, रमेश धनमोडे, नागेश बुरबुरे, सिद्धार्थ कांबळे (मिहान) साधना शुद्धोदन बडवणे, प्रेमलाल डोंगरे यांचा सन्मान केला. बहुजन सौरभचे डी.आर. कांबळे आणि कपिल नारनवरे यांच्या कार्याबद्दल अभिनंदन केले. आंबेडकरी वृत्तपत्राचा प्रेरणादायी इतिहास आहे. डॉ. बाबासाहेबांनी निर्माण केलेले वृत्तपत्र आर्थिक अडचणीमुळे बंद पडले. बहुजन सौरभची निर्मिती कोरोना संकटमय काळात झाली. आज आम्ही बऱ्यापैकी आर्थिक सबळ आहोत, त्यामुळे बहुजन सौरभ आर्थिक कारणाने बंद पड़णार नाही, अशी आशा आहे. बहुजन सौरभ ही चळवळ आहे, त्याला खतपाणी घालणे आपले कर्तव्य आहे. संध्या राजुरकर अत्यंत पोटतिडकीने बहुजन सौरभचा सांभाळ केला आहे. परंतु भविष्यात बहुजन सौरभचे वारसदार निर्माण झाले पाहिजे. धम्मसंगोष्टी आणि बहुजन सौरभचे ध्येय एकच आहे. त्यामुळे यातील प्रत्येक सभासदात बंधुता, प्रेमभावना दिसून येते, असे विविधांगी विचार सभेचे अध्यक्ष प्रा. यशवंत दुपटे यांनी व्यक्त केले.

या प्रसंगी बहुजन सौरभ तर्फे प्रश्नावली आयोजित केली होती. स्पर्धेत यशस्वी झालेल्या प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकास अनुक्रमे सुनंदा हरिश्चंद्र सुखदेवे, वज्रासनची प्रियभारती दुर्गम आणि रंजन वासेकर यांना पारितोषिके मिळाली. कार्यक्रमाची सुरुवात दादाराव बनसोड यांच्या भीमगीताने झाली. संचालन श्रीराम बनसोड आणि आभार शारदा देवळे यांनी व्यक्त केले. भागधारक प्रा. माधुरी गायधनी, डि.डि. गोंडाणे, प्रा.भीमराव गायकवाड, ज्योत्स्ना बनसोड, शुद्धोधन बडवणे कार्यक्रमाला उपस्थित होते. भरगच्च कार्यक्रमास नागपुरातील अनेक गणमान्य नागरिक उपस्थित होते. धम्मपालन गाथेनंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

## महत्त्वाच्या बातम्या

### गुजरात विधानसभेच्या उपसभापतींनी दिला राजीनामा

**अहमदाबाद :** गुजरात विधानसभेचे उपसभापती जेठाभाई भारवाड यांनी गुरुवारी आपल्या पदाचा राजीनामा दिला. त्यांनी मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल आणि भाजप प्रदेशाध्यक्ष जगदीश विश्वकर्मा यांच्या उपस्थितीत राजीनामा सादर केला आणि तो विधानसभा अध्यक्ष शंकर चौधरी यांनी स्वीकारला. राज्य सरकारने एक अधिकृत प्रसिद्धीपत्रक जारी करून याची घोषणा केली. प्रसिद्धीपत्रकानुसार, भारवाड यांनी त्यांच्या व्यस्त वेळापत्रकामुळे आणि इतर जबाबदाऱ्यांमुळे राजीनामा दिला.

### चीनचे भारतासोबतचे संबंध विकसित करण्यावर भर

**नवी दिल्ली :** भारत-चीन संबंधांसंदर्भात अमेरिकेच्या संरक्षण विभागाने अरथात पेंटागॉनने जारी केलेल्या एका ताज्या अहवालावरून चीन जबरदस्त भडकला आहे. अहवालात म्हणण्यात आले आहे की, प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरील (एलएसी) कमी झालेल्या तणावाचा फायदा घेत, भारतासोबचे द्विपक्षीय संबंध स्थीर करण्याची चीनची इच्छा आहे. तर भारत-अमेरिका संबंध आणखी मजूबत होण्यापासून रोखायचा त्याचा प्रयत्न आहे. या दाव्याचा चीनने तीव्र शब्दांत निषेध केला आहे. पेंटागनच्या या टिप्पणीवर चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते लिन जियान यांनी गुरुवारी (25 डिसेंबर) पत्रकार परिषदेत जोरदार प्रत्युत्तर दिले. 'चीन आपल्या राष्ट्रीय संरक्षण धोरणासंदर्भात पेंटागॉनच्या अहवालाचा निषेध करतो. चीन भारतासोबतच्या संबंधांकडे धोरणात्मक आणि दीर्घकालीन दृष्टीने बघतो,' असे जियान यांनी स्पष्ट केले. भारत-अमेरिका संबंधांत अडथळा निर्माण करण्यासंदर्भातील प्रश्नावर बोलताना, चीन भारतासोबतचे संबंध विकसित करण्यावर भर देतो, कोणत्याही तिसऱ्या देशाला लक्ष्य करण्यासाठी नाहीत, अशेही ते म्हणाले.

## भारताला मिळाले 60 किमी अंतराचे शक्तिशाली क्षेपणास्त्र आकाश-एनजी




**श्रीहरीकोटा :** भारताच्या प्रगत आकाश-एनजी क्षेपणास्त्राच्या वापरकर्त्यांच्या मूल्यांकन चाचण्या पूर्ण झाल्या आहेत, ज्यामुळे ते लष्कर आणि हवाई दलात समाविष्ट होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. तज्ज्ञांचा असा विश्वास आहे की या नवीन पिढीच्या जमिनीवरून हवेत मारा करणाऱ्या क्षेपणास्त्र प्रणालीमध्ये दक्षिण आशियातील सुरक्षा परिस्थिती बदलण्याची क्षमता आहे. आकाश-एनजी प्रणाली हाय-स्पीड हवाई धोक्यांना तोंड देण्यास सक्षम आहे. ध्वनीच्या वेगापेक्षा अडीच पट वेगाने कार्यरत असलेल्या या क्षेपणास्त्र प्रणालीची रेंज सुमारे 60 किलोमीटर आहे. ही प्रगत आवृत्ती भारताच्या उत्तर आणि पश्चिम सीमेवरील आधुनिक हवाई धोक्यांविरुद्ध एक शक्तिशाली ढाल प्रदान करते. आकाश-एनजी स्टील्थ लढाऊ विमाने, क्रूझ क्षेपणास्त्रे आणि ड्रोन सारख्या कमी रडार क्रॉस-सेक्शनसह शत्रूच्या धोक्यांना अचूकपणे लक्ष्य करू शकते. डीआरडीओचे अध्यक्ष समीर व्ही. कामत म्हणाले की, या यशस्वी चाचणीमुळे आकाश-एनजी सशस्त्र दलात समाविष्ट होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पुढील वर्षीपर्यंत ही क्षेपणास्त्र प्रणाली हवाई दलात समाविष्ट केली जाईल.

## परदेश दौऱ्यावर असताना राहुल गांधींवर पाळत ठेवली जाते : काँग्रेस



**नवी दिल्ली :** काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि लोकसभेतील विरोधीपक्ष नेते राहुल गांधी यांच्या परदेश दौऱ्यांवरून देशातील राजकीय वर्तुळात नेहमीच चर्चा आणि आरोप प्रत्यारोप होत असतात. दरम्यान, इंडियन ओव्हरसिज काँग्रेसचे अध्यक्ष आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सॅम पित्रोदा यांनी राहुल गांधी यांच्या परदेश दौऱ्यांवरून केंद्र सरकारवर गंभीर आरोप केले आहे. परदेश दौऱ्यांदरम्यान, राहुल गांधींवर केंद्र सरकारकडून पाळत ठेवली जाते, असा आरोप सॅम पित्रोदा यांनी केला आहे.

एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीदरम्यान, सॅम पित्रोदा यांनी राहुल गांधी यांच्या परदेश दौऱ्यांवरून भाजपाकडून करण्यात येणारे आरोप फेटाळून लावले. तसेच परदेश दौऱ्यांदरम्यान भारतीय दूतावासामधील लोक राहुल गांधींवर पाळत ठेवून असतात. तसेच अनेक परदेशी नेत्यांना राहुल गांधी यांची भेट घेऊ नका, असे सांगितले जाते, असा आरोप पित्रोदा यांनी केला. राहुल गांधी यांनी हल्लीच जर्मनीचा दौरा केला होता. या दौऱ्यावेळी राहुल गांधी यांनी भारतामधील लोकशाहीच्या स्थितीसह अनेक मुद्द्यांवर परखड भाष्य केले होते. दरम्यान, राहुल गांधी यांच्या या दौऱ्याच्या टायमिंगवरून अनेक सवाल उपस्थित करण्यात आले होते. आता सॅम पित्रोदा यांनी हे आरोप फेटाळून लावले आहेत. ते म्हणाले की, आता परदेश दौरे हे अचानक होत नाहीत. तर अनेक महिन्यांपूर्वी त्यांचे नियोजन होते. जर्मन दौऱ्याचा मुख्य हेतू हा पुरोगामी आघाडीची बैठक हा होता. त्यात सुमारे 110 देशातील पुरोगामी पक्ष सहभागी झाले होते. यावेळी राहुल गांधींवर परदेशात जाऊन भारत विरोधी वक्तव्ये करत असल्याच्या होणाऱ्या आरोपांबाबत सॅम पित्रोदा यांनी परखड शब्दात प्रत्युत्तर दिले. आजच्या काळात तुम्ही भारतामध्ये जे काही बोलता ते जगभरात पसरते आणि जे बाहेर बोलता ते देशात पसरते. खरंतर तुम्हा देशात बोला अगर परदेशात बोला, सत्य हे सत्यच असतं, असा टोलाही पित्रोदा यांनी लगावला.

## महानगरपालिकांमध्ये 'वंचित'बरोबर आघाडी करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न सुरू : हर्षवर्धन सपकाळ



**मुंबई :** राज्यातील महानगरपालिका निवडणुकीमध्ये वंचित बहुजन आघाडीबरोबर आघाडी व्हावी यासाठी प्रयत्न सुरु आहेत. नगरपालिका निवडणुकांमध्ये काँग्रेस पक्षाने आघाडी करण्याचे निर्णय स्थानिक नेतृत्वांकडे दिले होते तसेच अधिकार वंचितनेही दिले होते. वंचित व काँग्रेसची आघाडी व्हावी अशी अनेकांची इच्छा आहे आणि त्यादृष्टीने दोन्ही बाजूंच्या नेत्यांचा चांगला संवाद आणि प्रामाणिक प्रयत्न सुरु आहेत, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाच्या राज्य निवडमंडळाची बैठक झाली. प्रसार माध्यमांशी बोलतांना हर्षवर्धवन सपकाळ म्हणाले की, महानगरपालिकेच्या निवडणुका 15 तारखेला जाहीर झाल्या आणि त्यावेळसच नियोजनासाठी काँग्रेस पक्षाची बैठक झाली होती, निवडणूक व्यवस्थापन व उमेदवार निश्चित करण्यासाठी यावेळी रणनिती ठरवली होती. 28 महानगरपालिकांसाठी राज्य निवड मंडळाची बैठक पार पडली, जिल्हा काँग्रेस कमिट्यांच्या शिफारसी लक्षात घेऊन पक्ष पातळीवर एक महत्वाचा टप्पा आज पार पडला आहे. महाविकास आघाडी व इंडिया आघाडीचा घटक पक्ष नात्याने उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेशी चर्चा सुरू आहे. संघटनेच्या नेत्यांना तशा सूचना दिल्या आहेत, याशिवाय कोणत्याही पक्षाचा आघाडीसाठी प्रस्ताव आलेला नाही, तसा प्रस्ताव आला तर विचार केला जाईल. एका प्रश्नाला उत्तर देताना सपकाळ म्हणाले की, मुंबई महापालिकेतील आघाडीच्या चर्चेचा मी भाग नाही. पण अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव यु.बी. व्यंकेटश वंचित बहुजन आघाडीबरोबर चर्चा करत आहेत, यासाठी तिघांकडे पक्षाने संवादाची जबाबदारी सोपवलेली आहे, असेही काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले.

## आचारसंहितेच्या कात्रीत अडकले राज्य बालहक्क संरक्षण आयोग




**कोल्हापूर :** राज्याच्या बालहक्क संरक्षण आयोगावरील अध्यक्ष व सदस्यांच्या नियुक्त्या गेली सहा महिने लटकल्या आहेत. आता या नियुक्त्यांना आचारसंहितेचा फटका बसला आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीनंतर बहुधा मार्चनंतरच या नियुक्त्या होण्याची शक्यता आहे. परिणामी बालहक्कासंबंधीच्या राज्यभरातील सुनावण्या रेंगाळल्या आहेत. मुंबईच्या सुशीबेन शहा यांची अध्यक्षपदाची मुदत मे 2025 मध्ये संपली. त्यामुळे अध्यक्ष व सहा सदस्य नियुक्त करण्यासाठी महिला व बालविकास विभागाने जानेवारी 2025 मध्ये अर्ज मागवले. तेव्हा 333 अर्ज आले; परंतु अजून अनेक जणांना अर्ज करायचे असल्याने पुन्हा जूनमध्ये अर्ज मागवल्यावर 171 अर्ज आले. तेव्हापासून तातडीने निवडीची प्रक्रिया राबवणे शक्य होते; परंतु तसे घडले नाही. हा आयोग निम्न न्यायिक स्वरूपाचा आहे; परंतु त्यावर काम करण्यासाठी राजकीय कार्यकर्त्यांच्या उड्या पडतात. सदस्य व अध्यक्षांची निवड करण्यासाठी राज्य सरकारने महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली. बालन्याय अधिनियमाच्या कलम 109 नुसार राज्यातील बालकल्याण समित्यांवर देखरेख करण्याची जबाबदारी आयोगावर असते. आता आयोगाकडून फक्त प्रशासकीय कामे सुरू आहेत. विविध प्रकरणांत सुनावणी घेऊन निकाल देण्याचे अधिकार त्यांना नाहीत. या आयोगाची मुदत कधी संपते हे सरकारला माहीत असते, त्यामुळे त्यापूर्वीच अध्यक्ष व सदस्य निवडीची प्रक्रिया पूर्ण करून नवीन पदाधिकारी जाहीर होणे अपेक्षित असते; परंतु तसे घडत नाही. त्यामुळे काम बाधित होते. - डॉ. प्रमिला जरग, माजी अध्यक्षा, महिला व बालविकास संबंधित संस्थांचे राज्य नियंत्रण मंडळ, मुंबई.



## नाताळाला गालबोट

### महाराष्ट्र, केरळसह काही राज्यांत तोडफोड अन् झटापटीच्या घटना...

**नवी दिल्ली :** देशभरात ख्रिसमस सण मोठ्या उत्साहात साजरा केला जात असतानाच, छत्तीसगड, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश आणि केरळमधून विरोध प्रदर्शन, तोडफोड आणि झटापटीच्या घटना समोर आल्या आहेत. काही ठिकाणी धार्मिक संघटनांकडून निषेध व्यक्त करण्यात आला, तर काही भागांत हिंसाचाराच्या घटना घडल्या. **छत्तीसगडच्या कांकेर** जिल्ह्यातील आमाबेड़ा येथे झालेल्या हिंसाचार आणि कथित धर्मांतराच्या घटनेच्या निषेधार्थ 'छत्तीसगड सर्व समाजा'ने राज्यव्यापी बंदची हाक दिली होती. या बंदचा परिणाम रायपूर, दुर्ग आणि जगदलपूर येथे दिसून आला. आरोपानुसार, आंदोलनादरम्यान मॉलमधील ख्रिसमसची सजावट तोडण्यात आली, आतील मालमत्तेचे नुकसान झाले आणि कर्मचाऱ्यांना मारहाण करण्यात आली. तेलीबांधा पोलीस ठाण्याचे प्रभारी अविनाश सिंह यांनी सांगितले की, अज्ञात व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास सुरू आहे. मॉल प्रशासनाने मात्र स्पष्ट केले की, येथे दरवर्षी सर्व धर्मांचे आणि राष्ट्रीय सण साजरे केले जातात आणि ख्रिसमसची सजावट त्याच परंपरेचा भाग होती.

**महाराष्ट्रातील नवी मुंबईच्या** दिघा परिसरात एका मोबाईल दुकानात घुसून अर्जुन सिंह या हिंदू युवकाला मारहाण करण्यात आल्याची घटना घडली. अर्जुनने आपल्या व्हॉट्सॲप स्टेटसवर 'मला ख्रिसमसच्या शुभेच्छा देऊ नका' असे लिहिले होते. यामुळे संतप्त झालेल्या काही जणांनी दुकानाची तोडफोड करत त्याला मारहाण केल्याचा आरोप आहे. ही संपूर्ण घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. पीडिताचा आरोप आहे की, सुरुवातीला पोलिसांनी तक्रार नोंदवण्यास टाळाटाळ केली; मात्र नंतर दोन्ही बाजूंविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले.

**उत्तर प्रदेशातील बरेली** येथे ख्रिसमसच्या दिवशी बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी सेंट अल्फोन्सस कॅथेड्रल चर्चबाहेर आंदोलन केले. यावेळी हनुमान चालीसाचे पठण आणि घोषणाबाजी करण्यात आली.**दिल्लीच्या साकेत** भागात 'यूथ स्टँड्स फॉर सोसायटी' या संघटनेने तुलसी पूजनाचे आयोजन केले. आयोजकांनी सांगितले की, त्यांना ख्रिसमस साजरा करण्यास विरोध नाही, मात्र पाश्चिमात्य संस्कृतीच्या प्रभावामुळे हिंदू आपल्या परंपरा विसरत असल्याची चिंता आहे. हरियाणातील गुरुग्राममध्ये हिंदू संघटनांच्या विरोधामुळे ख्रिसमस पार्टी रद्द करण्यात आली, तर हिसारमध्ये चर्चसमोर हनुमान चालीसा पठणावरून तणाव निर्माण झाला.

**केरळच्या अलाप्पुझा** जिल्ह्यात ख्रिसमस ईव्हच्या रात्री दोन वेगवेगळ्या कॅरोल सिंगिंग गटांमध्ये वाद होऊन त्याचे रूपांतर हिंसक झटापटीत झाले. नूरनाड परिसरात रात्री साडेअकराच्या सुमारास ही घटना घडली.

ओबीसी-आदिवासी-वंचित-मायनॉरिटीज-उपेक्षित समुहाच्या न्याय हक्कासाठी
रिपब्लिकन व बहुजन जनतेचा बुलंद आवाद

रिपब्लिकन लोकशाही मोर्चा
मनपा नागपूर निवडणुकीकरिता इच्छुक उमेदवारांना आवाहन
संविधान विरोधी, आरक्षणविरोधी व लोकशाही विरोधी विचारधारेचा नागपूर मनपा निवडणुकीत पराभव करण्यासाठी
रिपब्लिकन लोकशाही मोर्चा सर्व पुरोगामी राजकीय संघटनासोबत गठबंधन....
फुले-शाहू-आंबेडकरी विचारधारा जोपासणाऱ्या प्रामाणिक, निष्ठावान, समर्पित व सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या युवा-युवती-महिला व पुरुष उमेदवारांनी खालील मोबाईल नंबरवर संपर्क करावा. लढेंगे - जितेंगे
मा. अरुणभाऊ गाडे (9764607057), प्रा. डॉ. रमेश पिशे (9373129563), मा. जनार्दन मून (9326887928), मा. प्रताप पटले (9373217357) प्रा. मधुकर उईके (9822937142 शब्बीर अहमद विद्रोही राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) प्रा. जावेद पाशा (9422154223)
जनसंपर्क पत्ता - द्वारा: प्रा डॉ. रमेश पिशे, 1143, आशीर्वाद नगर, छत्रपती शिवाजी महाराज चौक, रिंग रोड. नागपूर-24
रिपब्लिकन लोकशाही मोर्चा व आघाडीच्या उमेदवारांना बहुमताने निवडून द्या
विनीत - राष्ट्रीय संयुक्त मोर्चा भारत, मायनारिटीज डेमोक्रेटीक पार्टी, गोंडवाना गणतंत्र पार्टी, ओबीसी बहुजन आघाडी, ओबीसी जनमोर्चा, संभाजी ब्रिगेड, राष्ट्रीय मुस्लीम परिषद सीटू व इतर संविधानवादी संघटना
मार्गदर्शक - मा. इंजि. हमिदभाई (9370608200) समन्वयक - मा. किशोर गजभिये (9619777514)

“ भूतकाळ आणि वर्तमान : आपला आजचा दिवस कालच्या वाईट गोष्टींमुळे खराब करू नका... ”



बहुजन सौरभ **संपादकीय**

# मनुस्मृती जळाली, पण मनुवाद अजून जिवंत !

येशू ख्रिस्तांनी शोषितांना माणूस म्हणून उभे केले, तथागत बुद्धांनी मानवाला अंधश्रद्धा आणि कर्मकांडाच्या कैदेतून मुक्त केले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जन्माधारित गुलामगिरीला थेट आव्हान देत मनुस्मृती जाळली. हा प्रसंग केवळ इतिहाश्वस नव्हता; तो मानवविरोधी व्यवस्थेच्या छातीवर मारलेला घाव होता. 25 डिसेंबर 1927 रोजी महाड येथे पेटलेली आग केवळ कागद जाळणारी नव्हती; ती हजारो वर्षांच्या अन्यायाला जाळणारी होती. मनुस्मृती हा ग्रंथ नव्हे, तर तो स्त्रिया, शूद्र, अतिशूद्र यांना गुलाम बनवणारा विचारांचा कारागृह होता. त्या कारागृहाला आग लावण्याचे धाडस डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले – आणि म्हणूनच ते सत्तेला, धर्मांधतेला आणि मनुवादाला आजही असह्य वाटतात. येशू ख्रिस्तांनी अन्यायाविरुद्ध उभे राहिल्यामुळे क्रुसावर चढावे लागले. बुद्धांनी वर्णव्यवस्थेला नाकारले म्हणून ब्राम्हणी व्यवस्थेचा रोष सहन केला. डॉ. बाबासाहेबांनी मनुस्मृती जाळली म्हणून त्यांना ‘धर्मद्रोही’ ठरवले गेले. पण इतिहास एकच सांगतो – सत्ता नेहमी सत्याला घाबरते. आज देश-विदेशात हा दिवस मानवमुक्ती दिन म्हणून साजरा केला जात आहे, कारण आजही माणूस माणसाला माणूस मानायला तयार नाही. संविधान असतानाही जात विचार टिकून आहे. कायदे असतानाही स्त्रियांवर अत्याचार थांबत नाहीत. समानतेची भाषा बोलली जाते, पण सामाजिक विषमता पवित्र मानली जाते. मनुस्मृती जळाली, पण मनुवादी मानसिकता अजूनही सत्तेत, समाजात आणि धर्माच्या आड लपून जिवंत आहे. धर्म जर प्रश्न विचारायला मनाई करीत असेल, तर तो धर्म नसून दहशत आहे. परंपरा जर अन्याय टिकवून ठेवत असेल, तर ती परंपरा नसून गुन्हा आहे. आणि संस्कृती जर माणसाचे मोल ठरवत असेल, तर ती संस्कृती नव्हे – ती शोषणाची यंत्रणा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मनुस्मृती जाळली, पण त्यांनी संविधान लिहिले. त्यांनी द्वेष दिला नाही; त्यांनी अधिकार दिले. त्यांनी हिंसा शिकवली नाही; त्यांनी संघर्ष शिकवला. आज संविधानालाच कमजोर करण्याचे प्रयत्न होत असताना मनुस्मृती दहनाचा अर्थ अधिकच स्पष्ट होतो – हा लढा केवळ भूतकाळाचा नाही, तो वर्तमानाचा आहे. आजही जर कोणी म्हणत असेल की जात ही ‘नैसर्गिक’ आहे, विषमता ‘ईश्वरदत्त’ आहे आणि स्त्री ही दुय्यम आहे. तर तो मनुवादाचा वारसदार आहे. आणि अशा विचारांविरुद्ध उभे राहणे म्हणजेच मानवमुक्तीचा खरा उत्सव आहे. मानवमुक्ती दिन हा फक्त कार्यक्रमांचा, घोषणा-बाजीचा दिवस नाही. तो आरसा आहे – समाजाने स्वतःकडे पाहण्याचा. प्रश्न एकच आहे. आपण संविधानाच्या बाजूला आहोत की मनुस्मृतीच्या? आज येशूंची करुणा, बुद्धांची विवेकबुद्धी आणि आंबेडकरांचा बंडखोर विचार स्वीकारणे ही निवड नाही; ती जबाबदारी आहे. कारण मानवमुक्ती अर्धवट मान्य करून चालत नाही. मनुस्मृती जाळली गेली होती. आता मनुवाद जाळण्याची वेळ आली आहे. येशू ख्रिस्तांनी ‘तू शेजाऱ्यावर प्रेम कर’ असा संद्येश देत अन्यायग्रस्त, उपेक्षित आणि शोषितांच्या बाजूने उभे राहण्याचे धैर्य दिले. तथागत बुद्धांनी अंधश्रद्धा, कर्मकांड आणि वर्णव्यवस्थेला नाकारत ‘अप्प दीपो भव’ स्वतःचा प्रकाश स्वतः बना असा मानवमुक्तीचा मार्ग दाखवला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या दोन्ही परंपरांचा तात्त्विक वारसा स्वीकारत संविधानाच्या माध्यमातून सामाजिक क्रांतीचे शस्त्र सामान्य माणसाच्या हातात दिले. मनुस्मृती दहन हा धर्मविरोधी कृत्य नव्हता; तो मानवविरोधी धर्मकल्पनांविरुद्धचा सत्याग्रह होता. धर्म जर माणसाला माणसापासून वेगळे करीत असेल, तर तो धर्म नसून अन्यायाची व्यवस्था आहे. हे डॉ. बाबासाहेबांनी कृतीतून दाखवून दिले. आज देश-विदेशात हा दिवस मानवमुक्ती दिन म्हणून साजरा केला जात आहे, याचे कारणही स्पष्ट आहे. आजही जात, वर्ग, लिंग, धर्म आणि आर्थिक विषमतेच्या साखळ्या तुटलेल्या नाहीत. संविधानावर आघात होत आहेत, विवेकाला दडपले जात आहे आणि धर्माच्या नावाखाली द्वेष पसरवला जात आहे. अशा काळात येशूंची करुणा, बुद्धांची प्रज्ञा आणि आंबेडकरांचा संघर्ष अधिकच आवश्यक ठरतो. मानवमुक्ती म्हणजे केवळ इतिहासाची आठवण नव्हे; ती सतत चालणारी चळवळ आहे. ती विचारांतून कृतीकडे आणि कृतीतून परिवर्तनाकडे नेणारी प्रक्रिया आहे. आजचा दिवस आपल्याला प्रश्न विचारायला भाग पाडतो. आपण खरोखरच समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या मूल्यांवर उभे आहोत का? मानवमुक्तीचा लढा अजून संपलेला नाही. तो प्रत्येक शोषिताच्या आवाजात, प्रत्येक अन्यायाविरुद्ध उभ्या राहणाऱ्या माणसात आणि संविधानाच्या मूल्यांसाठी लढणाऱ्या प्रत्येक नागरिकात जिवंत आहे. येशू-बुद्ध-आंबेडकरांचा विचार स्वीकारणे म्हणजे मानवतेची बाजू घेणे होय. आज मानवमुक्ती दिनाच्या निमित्ताने एवढेच म्हणावेसे वाटते. जो विचार माणसाला माणूस बनवतो, तोच खरा धर्म आहे. ■ ■

# स्कूल ऑफ पाली
## बौद्धांसाठी पाली भाषा एक ज्ञानसागर

पाली भाषा ही ज्ञान प्राचीन भाषेपैकी एक आहे व ती पहीली प्राकृत भाषा म्हणूनही ओळखली जाते. इ. पु. तिसऱ्या शतकातील सम्राट अशोकाचे शिलालेख व स्तंभ यावरुन त्याचे प्रमाण मिळते. बुद्धांचे काळात पाली भाषा ही बोलीभाषा होती. त्यामुळे तथागत बुद्धानी धम्माचा उपदेश पालीमध्येच केला होता. आपला प्रमुख ग्रंथ त्रिपिटक हाही पाली भाषेतच आहे. काही भाषातज्ञाचे मतानुसार संस्कृत ही पाली भाषेचा अपभ्रंश आहे. उदा, जसे पाली भाषेत ‘ऋ’ हे अक्षर नाही. संस्कृत मधील सर्वात प्राचीन ग्रंथ ऋवेद. म्हणजेच ऋ हा नंतर आला असावा. तसेच मराठी ही सुध्दा पाली भाषेचा अपभ्रंश आहे. उदा. पालीत कमळ चा ‘ळ’ अक्षर नाही. म्हणजेच ळ हा नंतर आला असावा. अशी ही अति प्राचीन भाषा शिकायची संधी आपल्याला लाभत आहे. बुध्द वचन हे पाली भाषेत असल्यामुळे आपणाला ते समजण्याकरीता पाली भाषा समजणे आवश्यक आहे. याकरीता पाली लिपी शिकण्याची आवश्यक्ता नाही. पाली भाषेतील बुध्द वचन फक्त मराठीत समजुन घेणे गरजेचे आहे येवढेच. बुद्ध विहार समन्वय समीती व्दारे पाली परीक्षा 2017 पासून घेण्यात येत आहे. या समितीत पाली भाषेचे तज्ञ आहेत व त्यांनी पाली भाषेत असलेल्या बुध्द वचनाचे मराठीत भाषांतर केले असून त्याची सामान्य माणसाला समजेल अशी मांडणी केली आहे. त्यामुळे सदर पुस्तक हे पाली भाषा समजण्याचे एक प्रभावी अस्त्र आहे.

**अ) बुध्द विहार समन्वय समितीचे पाली पुस्तक :** 1) पाली परीक्षेचे पुस्तक परीक्षेच्या 3 महीने आधी देण्यात येते त्यामुळे अभ्यासास बराच वेळ मिळतो. 2) पाली परीक्षाचे पुस्तक हॅन्डी असुन अवघे 25 पानाचे आहे. 3) प्रत्येक वंदनेनंतर त्यातील प्रत्येक पाली शब्दाचा मराठीत अर्थ दिलेला आहे. 4) त्यानंतर प्रत्येक ओळीचा एकत्रित अर्थ दिला आहे. त्यामुळे वंदनेचा अर्थ लगेच कळतो. 5) परीक्षार्थिंचे सरावासाठी पुस्तकाचे शेवटी 264 प्रश्नाची पेढी ही दिली आहे. त्यामुळे अभ्यासा सोबतच परीक्षेची तयारीही होते. यावरून आपल्या लक्षात येईल की हे पुस्तक अभ्यासाकरीता परिपूर्ण असुन दुसरे कोणतेही पुस्तक संदर्भ करायची गरजच नाही. यानंतर आपण थोडे अभ्यासाकडे वळु. यात पाली व्याकरण, मोजक्याच वंदना व गाथा यांचा समावेश आहे.




**ब) पाली व्याकरण :** मराठी भाषा ही पाली भाषेचा अपभ्रंश आहे हे वर नमुद केलेले आहे. मराठी ही आपली बोलीभाषा आहे. पाली भाषेतील व्यंजन व स्वर, मराठी भाषेत अधिकचे आहेत. मराठी बाराखडी आपल्याला माहीतच आहे. त्यात थोडा बदल आहे. पालीत 33 व्यंजन व 8 स्वर आहेत. तर मराठी भाषेत 36 व्यंजन व 13 स्वर आहेत. म्हणजेच पाली भाषेत मराठीपेक्षा 3 व्यंजन व 5 स्वर कमी आहेत. हे समजुन घेतल्यास पाली भाषेचे व्याकरण समजणे सोपे आहे.

**क) बुध्द वंदना :** 1) त्रिसरण पंचशीला पुर्वी पंचांग प्रणामाचा क्रम दिला आहे. 2) बुध्द पुजा - यांत बुध्दाची पुजा शब्द सुमनाने केली आहे. 3) बुध्द वंदना- यात 6 प्रकारच्या वंदना आहेत.

i) पंचशील - पंचशील हे आपणा सर्वांनाच पाठ आहे. ii) अष्टशील - यामधे कामेसुमिच्छारा या गाथेऐवजी अब्रम्हचरीया ने replace केली आहे. तर सुरा मेरय मद्य नंतर तीन गाथा जोडल्या आहेत. त्या एका ओळीच्या असुन त्या समजणे सोपे आहे. iii) बुध्द गुण वंदना- बुध्दाचे विविध गुणाचा समावेश. iv) धम्म गुण वंदना - धम्माच्या विविध गुणाचा समावेश 1) संघ गुण वंदना- संघाच्या विविध गुणांचा समावेश. vi) रतनत्तय गुण वंदना- यांत बुध्द, धम्म व संघ यांचे गुणाचा समावेश.

**ड) गाथा- यांत तीन गाथा आहेत :** i) धम्म पालन गाथा-ही आपल्याला परिचित आहे. ii) संकप्पो (संकल्प). iii) पुण्णानुमोदन गाथा

बुद्ध पुजा, सहा वंदना व तीन गाथा या समजणे ही बुध्द, धम्म व संघ समजण्याची पहीली पायरी आहे. व त्या समजण्यापुरताच अभ्यास आपणाला करावयाचा आहे. परित्राण पाठ, लग्न, इतर घरघुती कार्यक्रम व सार्वजनिक धम्माचे कार्यक्रमात आपण या वंदना व गाथा नेहमीच ऐकतो. त्यामुळे त्या आपल्या परीचयाच्या आहेत. त्यांचा फक्त अर्थ समजून घ्यायचा आहे व ते पुस्तकाने सोपे करुन दिले आहे.


इंजि. नरेंद्र ताकसांडे
मो.9422922668

**इ) परीक्षेतील पेपरची रचना :** पाली परीक्षेचा मुख्य उद्देश ही आपल्या वंदना व गाथा यांचा अर्थ समजावा एवढाच आहे. अर्थ समजल्यास श्रध्दा वाढते व धम्म मजबूत होतो. या एकमेव उद्देशाने पाली परीक्षा घेण्यात येते. सर्वसाधारण पेपरची रचना अशी असते. 1) एकुण प्रश्न 50 असतात व प्रत्येक प्रश्नाला 1 गुण असतो. 2) हे 50 ही प्रश्न सोडविण्यास 1 तास वेळ असतो. तो भरपुर असुन या वेळेत पेपर सहज सोडविता येतो. 3) प्रश्नास चार Option देण्यात येतात व त्यापैकी फक्त एक Option टीक करायचा असतो. 4) सर्व साधारण पणे प्रश्नाचे उत्तर लिहावे लागत नाही. असल्यास सोप्या रिकाम्या जागा असतात. 5) पाली भाषेतील व्याकरणावर मोजकेच प्रश्न देण्यात येतात.

**फ) मनाची तयारी :** पाली परीक्षेस बसण्याकरीता मनाची तयारी असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. सर्वसाधारणपणे पाली परीक्षा न देण्याची कारणे.
1) वय झाल्यामुळे आठवण राहत नाही. 2) नापास झालो तर लोक हासतील. 3) आत्मविश्वासाची कमतरता
4) काही लोक पाली भाषा कठीण आहे असे सांगून मन विचलित करतात.
उपरोक्त नमुद केलेले पुस्तकाचे विवरण, परीक्षेची रचना व मोजकाच अभ्यास याचा थोडा जरी विचार केला तर ही सर्व कारणे अजिबात digest होत नाही. पाली परीक्षा ही बोर्डाची किंवा विद्यापीठाची नाही त्यामुळे विचलित होण्याचे अजिबात कारण नाही.

**ई) प्रत्यक्ष अनुभव :** यावर्षी आम्ही दोघेही पहील्या पाली परीक्षेस बसलो. परीक्षेबाबत माझे मत आपणाशी Share करीत आहे.
i) परीक्षेची तयारी करतानाचे मत : 1) पुस्तकात वंदना व गाथा यांचे अर्थ दिल्यामुळे त्याचे महत्तव कळ्ले. 2) महत्त्व कळत असल्यामुळे धम्माचे प्रती श्रध्दा वाढली. 3) या आधी आपण परीक्षेस बसावयास पाहीजे होते.
ii) निकालानंतरचे मत : 1) उत्तम श्रेणीत पास झाल्यामुळे आत्मविश्वास वाढला. 2) पुढील पालीच्या परीक्षा देण्याचा निर्धार केला. पाली भाषा समजुन घेणे हे धम्माचे काम आहे व त्यात प्रत्येकाने हातभार लावला पाहीजे. धम्म समजण्याची एक संधी आपणास उपलब्ध झाली आहे व त्या संधीचा उपयोग आपण सर्वांनी करायलाच पाहिजे.

**जाता जाता :** पुढील वर्षांत भारताच्या जनगणनेचा टप्पा आपल्या राज्यात सुरु होत आहे. पाली भाषेला अभिजित भाषेचा दर्जा प्राप्त झाला आहे तो कायम रहावा यासाठी सरकार दरबारी याबाबत जास्तीत जास्त नोंदी होणे आवश्यक आहे. हे महत्त्व समजून आपणाला जनगणनेच्या वेळी, येणाऱ्या भाषेत पालीचा उल्लेख करावयाचा आहे. त्याकरिता सुध्दा पाली शिकणे गरजेचे आहे. ■ ■

# सामाजिक परिवर्तनाच्या वाटेवरील दिशादर्शक
## भाऊसाहेब उपाख्य डॉ. पंजाबराव देशमुख

शिक्षण हेच सर्वांगीण विकासासाचे प्रभावी साधन आहे हे महात्मा जोतिबा फुले यांना प्रकर्षाने जाणवले आणि त्यांनी आपल्या सर्वंकष समाजक्रांतीची सुरूवात सन 1848मध्ये पुणे येथील बुधवार पेठेतील श्री.भिडे यांच्या वाड्यात मुलींची शाळा सुरू करून केली. शिक्षणाच्या अभावी सर्व गोरगरीब आणि दीन-दलित समाज प्रस्थापितांच्या गुलामगिरीत गटांगळ्या खात असल्याचे आणि तो निष्ठुरपणे शोषला जात असल्याचे एक विदारक चित्र म.फुले यांनी अनुभवले आणि त्यांनी गोरगरीब दीन, दलित तसेच स्त्रियांना विद्येची संजीवनी देऊन जागृत करण्याचा अहोरात्र प्रयत्न केला. हा बोलका इतिहास भाऊसाहेब उपाख्य डॉ. पंजाबराव देशमुख यांना प्रेरणा देणारा ठरला. सोबतच महात्मा जोतिबा फुले यांना गुरूस्थानी मानणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुद्धा शिक्षणाला सर्वोच्च स्थानी ठेवून. ‘शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे, जो ते प्राशन करील तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही’ असे शिक्षणाचे महत्त्व विशद केले आणि त्यांनी बहुजन समाजाला शिका-संघटित व्हा आणि संघर्ष करा हा बहुमोल मंत्र दिला. महात्मा फुले यांच्या तत्वज्ञानाने प्रभावित होऊन राजर्षी शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील आदिंनी महाराष्ट्रात शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रांत क्रांती घडवली. तद्वतच विदर्भात भाऊसाहेब उपाख्य डॉ. पंजाबराव देशमुख यांनी गोरगरीब व दीन दलितांना अज्ञान-अंधःकारातून प्रकाशात आणण्याचा यशस्वी प्रयत्न करीत दलितांचे दुःख निवारण्याचे महान कार्य केले. त्यातूनच पुढे त्यांनी 1932 साली अमरावती येथे श्री शिवाजी एज्युकेशन सोसायटीची स्थापना करून त्याव्दारे समाजाचे दुःख दारिद्र्य, निरक्षरता आणि अंधश्रद्धा नाहिशी करण्याचे कार्य सुरू केले. त्यांनी अमरावती या शहरात ही शिक्षण संस्था स्थापन केली असली तरी, त्यांचे मुख्य लक्ष्य ग्रामीण भाग हेच होते. खेड्यापाड्यांतील अज्ञान - अंधकारात आणि दारिद्र्यात खितपत पडलेला समाज प्रामुख्याने त्यांच्या डोळ्यासमोर होता. यासाठी त्यांनी खेड्यापाड्यांत अल्पावधीत शिक्षणसंस्थांचे जाळे विणले. सोबतच अनेक ग्रामीण तरुणांना आपल्या संस्थेत उच्च विद्याविभूशीत केले. प्रसंगी शिष्यवृत्त्या देऊन बाहेर शिक्षणासाठी पाठविले. एकंदरीत शिक्षणातून विकास व विकासातून शिक्षण हे तत्व अंमलात आणण्याचा त्यांनी यशस्वी प्रयत्न केला. भारतीय समाजपुरूषाचे सत्व कष्टकरी कृषकात पाहणाऱ्या आणि या कृषकाच्या आर्थिक विकासासाठी तसेच शैक्षणिक व सांस्कृतिक उत्थानासाठी उभे आयुष्य चंदनासारखे झिजविणाऱ्या भाऊसाहेबांनी प्रत्यक्ष राजकारणात पडून राजकीय सत्तेला सुद्धा त्या कार्यासाठी अक्षरशः वाकविले. त्यांनी परिश्रमपुर्वक नावारूपास आणलेल्या शैक्षणिक संस्था, उद्योग प्रशिक्षण संस्था, क्रीडा प्रशिक्षण संस्था, कृषीशिक्षण संस्था तथा कृषीसंशोधन संस्था, इतकेच नव्हे तर आज नावारूपास आलेली कृषी विद्यापीठे या साऱ्यांच्या रूपाने भाऊसाहेबांचे कार्यकर्तृत्व भारतभर दिसून येते. भाऊसाहेब उपाख्य डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या हयातीतील अत्यंत महत्त्वपूर्ण व उल्लेखनीय सामाजिक कार्य म्हणजे अस्पृश्यता निवारण होय. 1927 च्या नोव्हेंबर पर्यंत अस्पृश्यांना अमरावती येथील अंबादेवीच्या देवळात प्रवेश बंदी होती. प्रश्न मुर्ती पुजेचा नव्हता तर तो सामाजिक विषमतेचा व अस्पृश्यतेचा होता. एका बापाची चार लेकरे स्पृश्य - अस्पृश्य कशी हा भाऊसाहेबांचा सवाल होता. त्यामुळे मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश मिळावा यासाठी सत्याग्रह करण्यासाठी पुढे येऊन रणशिंग फुंकणारे भाऊसाहेब केवळ 29 वर्षांचे होते, आणि मंदिर प्रवेशाला अमरावती शहरातील प्रसिद्ध राष्ट्रभक्त, थोर मुत्सद्दी, बुवा, पंडित, वकील, श्रीमंत, भाविक बहुजन समाज, व्यायामप्रेमी युवकांची संघटित शक्ती अशा अनेकांचा विरोध होता. असे असतांनाही मंदिरप्रवेशाच्या सत्याग्रहाचा भाग म्हणून नोव्हेंबरच्या मध्यंतरात सत्याग्रहींची विदर्भ प्रांतिक परीषद आयोजित करण्यात आली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना परीषदेचे अध्यक्ष नियोजित केले होते. परीषदेच्या निमित्ताने भाऊसाहेबांच्या तुफानी प्रचार दौऱ्याचा परिपाक म्हणून गावोगावचे सत्याग्रही जत्थे अमरावती नगरीत शिरू लागले होते. देवीच्या महाद्वारी मोर्चे नेऊन हजेरी देऊ लागले. श्रीमंत दादासाहेब खापर्डे हे अंबादेवी संस्थानचे प्रमुख विश्वस्त होते. त्यांचे पुराणमतवादी सहकारी हट्टाला पेटले होते व मोर्चेकऱ्यांमुळे परीस्थितीला अनिष्ट वळण लागण्याची शक्यता होती. त्यांनीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पत्र दिले, की येत्या तीन महिन्यांत आमच्या विश्वस्तांची मने वळवून मी हे मंदिर सर्वांसाठी खुले करून देतो. तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शांततापूर्ण हृदय परिवर्तनाचा मार्ग स्वीकारून सत्याग्रह लांबणीवर टाकण्याचे ठरवले. पुढे बऱ्याच कालावधीनंतर या मंदिराची दारे सर्वांसाठी खुली करण्यात आली. त्याचबरोबर भारतात मंदिरप्रवेशाचे नवे पर्व सुरू झाले. भाऊसाहेबांचे विशेष अतुलनीय कार्य म्हणजे संविधान समितीत त्यांनी 1946-50 या कालखंडात कार्य केले असून भारताची भावी राज्यघटना निर्माण करण्याच्या ऐतिहासिक कार्यात भाऊसाहेबांनी अत्यंत जिव्हाळ्याने व व्यापक जनहिताच्या दृष्टीने भाग घेतला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. राजेंद्रप्रसाद, पं.जवाहरलाल नेहरू, अनंतशयनं अय्यंगार, ह.वि.कामथ, आर.के.सिध्वा, रंगराव दिवाकर, प्रो.रंगा, मिनू मसानी आदि मंडळी घटना समितीत होती. या सर्वांनी भाऊसाहेबांच्या वक्तव्याची व त्यांच्या जनहितदृष्टीची मुक्तकंठाने प्रशंसा केली होती. हरिजनादि पददलित जातीव्यतिरिक्त भारतात आणखी काही अत्यंत दुर्लक्षित, असहाय व दलित अशा जाती आहेत, यांची जाणीव घटना समितीतील बहुसंख्य सभासदांना भाऊसाहेबांमुळे झाली. म्हणून त्यांच्याही प्रगतीकरिता भारतीय राज्यघटनेत काही तरतूद करून ठेवता आली. या आशयाचे उद्गार भारतीय राज्यघटनेचे प्रमुख शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटना निर्मितीनंतर केलेल्या समारोपीय भाषणात काढले. जातीवाचक उल्लेख सरकारी कागदपत्रांतून गाळून टाकण्यासंबंधीचे विधेयक 17 फेब्रुवारी 1948 व 11 ऑगष्ट 1948 या दोन दिवशी आले. डॉ. भाऊसाहेबांनी घटना समितीत वरील विधेयकावर अत्यंत परिणामकारक भाषणे केलीत. हे विधेयक ना.रंगराव दिवाकर यांनी घटना समितीत आणले होते. भाऊसाहेबांनी या विधेयकाला विरोध केला. या विधेयकावर बोलताना त्यांनी जातीभेद समूळ नष्ट करण्याचे मार्गही सांगितले. शिक्षणाचा प्रसार हेच जातीयता नष्ट करण्याचे एकमेव प्रभावी साधन होय; उच्च शिक्षण घेतलेले युवक व युवती जातीयवादाचा विषारी फणा चिरडून टाकणार आहेत, असे त्यांनी प्रतिपादित केले. असे विदर्भाचे भाग्यविधाते, घटना समितीचे चिकित्सक सदस्य, बहुजन समाज, शेतकरी, दलित, शोषित, मागासवर्गीयांचे हित जपणारे आणि अस्पृश्य निवारणासाठी झटणारे भाऊसाहेब उपाख्य डॉ.पंजाबराव देशमुख यांचा जन्म 27 डिसेंबर 1898 ला अमरावती जिल्ह्यातील चांदुर रेल्वे तालुक्यातील पापळ या खेड्यात झाला. त्यांच्या 127 व्या जयंतीनिमित्त त्यांना कोटी कोटी प्रणाम! ■ ■


रतन तायडे
94201 25761




# रोजगार कसा बुडत चालला?

आपल्या देशात बेरोजगारीचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. सुशिक्षित युवकदेखील या समस्येमुळे हैराण झालेले दिसतात. तरीसुद्धा या प्रश्नावर ठोस आणि मोठ्या प्रमाणावर आवाज उठताना दिसत नाही. यामागे राष्ट्रवाद, धर्मांधता किंवा इतर समाजमानसशास्त्रीय कारणे असू शकतात का, हा विचार करण्याची गरज आहे. याच अनुषंगाने ही लेखमाला.

**रोजगार का बुडतोय? :** ‘अझीम प्रेमजी विद्यापीठा’च्या अभ्यासानुसार रोजगारनिर्मिती घटत चालली आहे. ‘केअर रेटिंग’च्या अहवालानुसार कॉर्पोरेट कंपन्यांत नवे रोजगार निर्माण होण्याची गती 3.8टक्के नी घसरली आहे. लघु उद्योगांत तर नोकऱ्याच कमी होत आहेत. ‘सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमी’च्या मते 2022 मध्ये तब्बल 1 कोटी 10 लाख रोजगार गेले. डिसेंबर 2018मध्ये बेरोजगारीचा दर 7.4टक्के होता; तो नंतर वाढून 7.9टक्केवर पोहोचला. ही स्थिती केवळ कोव्हिडमुळेच उद्भवली का, हा प्रश्न आहे.




**कोव्हिडचा फटका :-** कोव्हिड काळात लाखो लोकांनी नोकरी गमावली, पगार कपात भोगली किंवा रोजगारावरील अनिश्चिततेला तोंड दिले. 2020 मध्ये हतबलतेतून 3,548 तरुण-तरुणींनी आत्महत्या केल्याची नोंद आहे. ऑक्टोबर 2020 मध्ये देशातील बेरोजगारी 7टक्के, नोव्हेंबरमध्ये 7.75टक्के तर डिसेंबरमध्ये 7.91टक्के इतकी झाली. शहरी बेरोजगारी - 9.30टक्के, ग्रामीण बेरोजगारी - 7.28टक्के IPSOS या जागतिक संस्थेच्या सर्व्हेनुसार 70टक्के भारतीयांना कोरोना इतकीच बेरोजगारी आणि रोजगार सुरक्षिततेची चिंता होती. बांगलादेश (5.3टक्के), व्हिएतनाम (2.3टक्के) आणि मेक्सिको (4.7टक्के) यांच्या तुलनेत भारताची 2020 मधली कामगिरी रोजगाराच्या बाबतीत खालावलेली होती.


आर. के. जुमळे
93264 50506

**उद्योग-व्यवसायांवरील संकट :-** विख्यात उद्योगपती आनंद महिंद्रांनी स्पष्ट केले की वाहन उद्योगातील मंदीमुळे किमान साडेतीन लाख रोजगार धोक्यात आले. टाटा समूहाने पुण्यातील कारखाना काही दिवसांसाठी बंद ठेवण्याचा निर्णय घेतला. मारुती उद्योगसमूहात इतिहासात प्रथमच मोटारविक्रीत 25 टक्के घट झाली. दुचाकी व घरबांधणी क्षेत्रातही परिस्थिती गंभीर आहे.

**औरंगाबादचा अनुभव :-** औरंगाबाद हे महाराष्ट्राचे ऑटोमोबाइल हब म्हणून ओळखले जाते. परंतु, मंदीमुळे 10 लाख नोकऱ्या धोक्यात आल्या. औरंगाबाद औद्योगिक वसाहतीतील हजारो सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग दुष्काळ, जीएसटी व मंदीमुळे त्रस्त झाले. वाहनांच्या विक्रीतील घट आणि जीएसटीचा बोजा यामुळे उत्पादन कमी झाले; कामगारांच्या शिफ्टही घटल्या.

**औद्योगिक मंदीचे परिणाम :-** 2015-16 मध्ये 154, तर 2017-18 मध्ये 819 कारखाने बंद पडले. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सांगितल्याप्रमाणे नोटबंदीनंतर देशभरात 6.80 लाख उद्योग बंद झाले; त्यापैकी 1.42 लाख उद्योग महाराष्ट्रातील आहेत.

**खपातील घट :-** 2019-20 मध्ये मोटारींचा खप 23.3टक्के, दुचाकी 11.7टक्के, व्यावसायिक वाहनं 9.5टक्के आणि ट्रॅक्टर 14.1टक्के ने घसरले. SIAM व FADA या संघटनांच्या मते 2.30 लाख रोजगार गेले; 286 मोटार वितरक बंद पडले. बांधकाम क्षेत्रात मार्च 2019 अखेर 12.80 लाख घरे विकली गेली नाहीत. एफएमसीजी क्षेत्रात हिंदुस्तान लिव्हर, डाबर, ब्रिटानिया, एशियन पेंट्स यांनाही मोठा फटका बसला. ग्राहकांकडून मागणी घटल्याचे धाऊक किंमत निर्देशांक (1.08टक्के) व उत्पादन क्षेत्राचा चलनवाढ निर्देशांक (0.34टक्के) यातून स्पष्ट होते.

अशा मंदीच्या गर्तेत अर्थव्यवस्था अडकली असल्याने रोजगारनिर्मिती थांबली आहे आणि अस्तित्वातले रोजगार दिवसेंदिवस बुडत चालले आहेत. एका बाजूला बेरोजगारांची संख्या वाढते आहे; तर दुसऱ्या बाजूला नोकरीत असलेल्यांचे रोजगार धोक्यात आहेत. यावर ठोस उपाययोजना झाली नाही तर देश रोजगाराच्या मोठ्या संकटात सापडेल. लोकांची क्रयशक्ती घटल्यास देशातील उत्पादनाची खपत कशी वाढणार? तरीही अदानी-अंबानी यांची संपत्ती चांद्रयानासारखी झेप घेत जगात स्पर्धा करत आहे, आणि बेरोजगार मात्र पोटभर स्वप्नांवरच समाधान मानत आहेत! ■ ■




# मानसिक आरोग्य
## वैयक्तिक प्रश्नातून सार्वजनिक धोरणाकडे

मानसिक आरोग्य ही सार्वजनिक जबाबदारी असल्याचे बारामतीतील ‘अक्षर मानव मानसोपचार तज्ञ व अभ्यासगट परिषदेत’ सखोल मंथन करण्यात आले. मानसिक आरोग्याचे प्रश्न आज वैयक्तिक पातळीवर मर्यादित न राहता सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेपुढील गंभीर आव्हान बनले आहेत. याच पार्श्वभूमीवर बारामती येथे ‘अक्षर मानव मानसोपचार तज्ञ व अभ्यासगट परिषद’ उत्साहात आणि अभ्यासपूर्ण वातावरणात पार पडली. यात मानसिक आरोग्य ही सार्वजनिक जबाबदारी असल्याचे मानसोपचार तज्ञ परिषदेत यावर ठोस चिंतन करण्यात आले. मानसिक आरोग्य विषयक शास्त्रीय चर्चा, मानसोपचार काळाची गरज, मानसोपचाराबद्दल लोकांचे भ्रम कसे दूर करणार?, मानसोपचार व्यवसायातल्या अडचणी व मार्ग, मानसोपचाराचे वयोगट व त्यांच्यासाठी करायचे प्रयोग व काम, मानसोपचार तज्ञांनी घेण्याची काळजी, करायचा अभ्यास, मानसोपचार तज्ञ व इतर वैद्यकीय क्षेत्रांचा समन्वय, या क्षेत्रातील अनुभवांची देवाणघेवाण आणि धोरणात्मक विचारमंथन यासाठी ही परिषद महत्त्वाचे विचारपीठ ठरली. ही परिषद मेडिकोझ गिल्ड, बारामती व अक्षर मानव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली होती. ही परिषद दि. 13 व 14 डिसेंबर 2025 रोजी बारामती येथील मेडिकोझ गिल्डच्या हॉलमध्ये पार पडली. परिषदेचे अध्यक्षस्थान डॉ. अशोक तांबे यांनी भूषविले. मार्गदर्शक माऊली सेवा प्रतिष्ठान मनगाव अहिल्यानगरचे डॉ. सुचेता धामणे व डॉ. राजेंद्र धामणे यांनी सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आयोजन भिकोबा तांबे सभागृह, बारामती येथे करण्यात आले होते. अक्षर मानव संस्थेचे संस्थापक राजन खान यांच्या संकल्पनेतून या परिषदेची मांडणी करण्यात आली होती. परिषद आयोजनाची जबाबदारी झरीना खान व सुजीत चव्हाण यांनी यशस्वीपणे सांभाळली.

**महिलांचे मानसिक आरोग्य - संशोधन, अनुभव व वास्तव :-** माऊली सेवा प्रतिष्ठान मनगावचे डॉ. सुचेता धामणे यांनी आपल्या अभ्यासपूर्ण सादरीकरणात स्वित्झर्लंडमधील मानसिक आरोग्य प्रकल्प, Women's Brain Project, झुरिक युनिव्हर्सिटीतील संशोधन तसेच ड्रग ट्रायल्समध्ये महिलांचा अपुरा सहभाग यामुळे उपचारांमध्ये येणाऱ्या मर्यादा स्पष्ट केल्या. मानसिक आरोग्य हे केवळ वैयक्तिक नसून Physical, Mental आणि Social Health या तिन्हींचा समतोल साधणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले. कम्युनिटी आयसोलेटेड भागांमध्ये मानसिक, शारीरिक आणि लैंगिक आजारांचे प्रमाण अधिक असल्याचे वास्तव उदाहरणांसह मांडण्यात आले. घाट परिसरातील, रस्त्यावर भटकणाऱ्या, शेवटच्या टप्प्यातील रुग्णांचे अनुभव ऐकताना सभागृह गंभीर झाले. ‘अन्न देणे पुरेसे नसून योग्य उपचार आवश्यक आहेत,’ हा संदेश ठळकपणे पुढे आला. महिलांचा मेंदू व मानसिक प्रतिक्रिया वेगळ्या असताना उपचार पद्धती लिंग-संवेदनशील असणे गरजेचे असल्याचे त्यांनी ठामपणे मांडले. सुशिक्षित महिलांमध्येही नैराश्य, उद्वेग व ओळखीचे प्रश्न वाढत असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

**कुटुंबव्यवस्था, ओळख आणि सामाजिक बदल :-** परिषदेत कुटुंबव्यवस्थेतील बदल, नातेसंबंधांतील दुरावा, संवादाचा अभाव आणि त्याचा मानसिक आरोग्यावर होणारा परिणाम, महिला, कुटुंब व समाज यावर व्यापक सखोल चर्चा झाली. Identity व आपलेपणा यांचा शोध हा आधुनिक समाजातील केंद्रस्थानी असलेला मानसशास्त्रीय मुद्दा असल्याचे तज्ज्ञांनी नमूद केले. बाल मानसशास्त्र, युवकांचे प्रश्न, मोबाईल व डिजिटल माध्यमांचा अतिवापर आणि स्पर्धात्मक ताण यामुळे पुढील पिढी अधिक असुरक्षित होत असल्याची चिंता या वेळी व्यक्त करण्यात आली.

**मनःस्वास्थ्याचा प्रवास**


प्रवीण गांगुर्डे
मो. 9890631933

**उपचार पद्धती व कम्युनिटी दृष्टिकोन :-** मानसोपचार तज्ञांचे राज्यस्तरीय मंथनातून मानसिक आरोग्याबाबत धोरणात्मक चर्चा करण्यात आली, औषधोपचार व मानसोपचार यांचा समन्वय, आवश्यक असणाऱ्या सर्व उपचारपद्धती, एक्स्पोजर थेरपी, दीर्घकालीन इंटरव्हेन्शन, तसेच शेवटच्या टप्प्यातील रुग्णांसाठी Life-long care या विषयांवर व्यावहारिक अनुभव मांडण्यात आले. कम्युनिटी आयसोलेटेड भागांमध्ये मानसिक व शारीरिक आजारांचे प्रमाण अधिक असून केवळ अन्न किंवा निवारा नव्हे तर सर्वांगीण उपचार आवश्यक असल्याचे वास्तव उदाहरणांद्वारे स्पष्ट झाले.

**राज्यभरातून तज्ज्ञांचा सहभाग :-** या परिषदेत राज्यभरातून मनोविकारतज्ञ, मानसोपचारतज्ञ, मानसशास्त्रज्ञ, मानसोपचार सामाजिक कार्यकर्ते, प्राध्यापक व शिक्षक सहभागी झाले होते. त्यामध्ये अर्चना तोंडे, राज्य अध्यक्ष अक्षर मानव मानसोपचार विभाग, नीलिमा शिकारखाने कार्याध्यक्ष, प्रवीण गांगुर्डे मानसोपचारतज्ञ पी. एस. डब्लू, यमुना नाखले (नागपूर) राजशा खान, स्मिता शहा, सुषमा अडसूळ (बारामती), सुदेश इंगळे (उस्मानाबाद), यशवंत सपकाळे (उल्हासनगर), शितल अंकुश, गणेश पाटील, सुनील भालेराव, दीपली क्षीरसागर, सोमनाथ भोज, स्नेहल जाधव, महेंद्र गायकवाड, अंकुश पाटील, अनुजा पाटील(पुणे), रवी खानविलकर (नवी मुंबई), कांचन हुन्नुरे, अश्विनी काळे(सोलापूर), डॉ. भूषण चव्हाण (कोल्हापूर), रवींद्र जांभळे (नाशिक), कैलासचंद्र मोहिते (पनवेल), मिलिंद कडवईकर (रत्नागिरी), भूषण सुकेशनी वामनराव (परभणी), खंडू चव्हाण (सांगली), मयुर पोव्हरे (बीड), मोनिका शहा (पंढरपूर), निकीता भालेराव, सुरेन सुनंदा, सदानंद यादव, जगन्नाथ साबळे, महेंद्र पवार, किरण जाधव, सुनिल मोरे, सोनाली गायकवाड (मुंबई) या तज्ज्ञांचा समावेश होता. मानसिक आरोग्य ही लक्झरी नाही, तर मूलभूत गरज आहे. ‘सुशिक्षित महिलांनाही मानसिक आजारांचा सामना करावा लागतो, हे वास्तव स्वीकारून समाजाने संवेदनशील व्हायला हवे,’ माणूस तेथे मानसोपचार या ठरावाबरोबर मानसिक आरोग्य ही फक्त वैयक्तिक समस्या नसून सार्वजनिक, सामाजिक आणि धोरणात्मक जबाबदारी आहे, मानसिक आरोग्यावर समाजकेंद्री दृष्टीकोनाची गरज असल्याचे ठाम निष्कर्ष या परिषदेतून पुढे आले. बाल्यापासून वृद्धापकाळापर्यंत मानसिक आरोग्यासाठी समन्वित, जेंडर-सेंसिटिव्ह आणि कम्युनिटी-आधारित मॉडेल विकसित करण्याची गरज अधोरेखित करण्यात आली. मानसिक आरोग्याची आव्हाने आणि उपाय यावर सखोल विचारमंथन झाले. मानसिक आरोग्य व्यवस्थेसाठी नव्या दिशेची गरज असल्याचे या परिषदेत चिंतन करण्यात आले. बारामतीतील ही परिषद मानसिक आरोग्याच्या क्षेत्रात राज्यस्तरीय पातळीवर दिशा देणारी ठरली, असे मत अनेक सहभागी तज्ज्ञांनी व्यक्त केले. ■ ■

“ आत्मविश्वासावर तुमचा खरा ‘मी’ कधी विसरू नका आणि स्वत:ला कमी लेखू नका... ”

बहुजन सौरभ
BAHUJAN SAURABHA



# लोकाभिमुख साहित्यिक आणि कणखर कार्यकर्ता प्रा. जावेद पाशा

**प्रा. जावेद पाशा कुरैशी. महाराष्ट्राच्या साहित्य, सांस्कृतिक आणि राजकीय पटलावरील महत्वाचे नाव. एक वादळी व्यक्तिमत्व. अनेक दशकांपासून जावेद पाशा सर सामाजिक कार्य करत आहेत. या त्यांच्या कार्याची दखल घेवून ‘महाराष्ट्र फाउंडेशन (अमेरिका) 2025 चा’ सामाजिक कार्यकर्ता ‘संघर्ष’ हा सन्मानाचा पुरस्कार जावेद पाशा सरांना जाहीर झाला. या त्यांच्या यशाबद्दल मी सरांचे अभिनंदन करतो. पाशा सरांना हा पुरस्कार सहज मिळालेला नाही. सरांचे कार्यकर्तृत्वच इतके मोठे आहे की, आज ना उद्या त्यांच्या कार्याची दखल या पुरस्काराला घ्यावीच लागली असती.**

प्रा. जावेद पाशा सरांचे मूळ गाव गडचिरोली. पण ते नागपूरला आलेत स्थायिक झालेत. नागपूर त्यांची कर्मभूमी म्हंटले तरी वावगे होणार नाही. सरांना आधीपासूनच सामाजिक कार्याची ओढ होती. फुले, शाहू, आंबेडकरांच्या विचारांशी त्यांची ओळख झाली आणि खऱ्या अर्थाने ते चळवळीत सक्रिय झाले. सरांनी सुरुवातीच्या स्वतःच्या जडण घडणीच्या काळात काही वेळ प्राध्यापक म्हणून सेवा दिली. काही काळ सर शासकीय सेवेत सुद्धा राहिलेत. पण मनात दडलेला कार्यकर्ता त्यांना स्वस्थ बसू देत नसल्याने आणि सामाजिक सेवेची ओढ असल्याने ते पूर्ण वेळ चळवळीत सक्रिय झाले. सरांचा मूळ पिंड कवीचा. कार्यकर्ता म्हणून दिवसभर सामाजिक आंदोलन, मोर्चे, धरणे, यात राबणे आणि रात्रीला ते सारे अनुभव शब्दबद्ध करणे. हा त्यांचा नित्याचा न चुकणारा क्रम आणि या सर्व अनुभवांचा वादळरुपी कविता संग्रह, ‘बएत’ प्रकाशित झाला. या कविता संग्रहाची अवघ्या महाराष्ट्रातील रसिक, वाचक, समीक्षक आणि अनेक साहित्य संस्थांनी दखल घेतली. कवी म्हणून त्यांची ख्याती अधिकच उंचावत गेली. ते सतत लिहीत राहिले, वाचत राहिले. चिंतन, वाचन, आंदोलन, सरांचे नेहमीचेच. लेखनात सातत्य असल्यामुळे, मुहजिर, पैलुखाच्या घरात, हे गांधी काढतच राम नाही, सलीब, नारंगी जुलूस, सिर्फ शोर नहीं हू. असे लोकप्रिय कवितासंग्रह प्रकाशित झालेत. प्रपंचाची जिम्मेदारी कुशलतेने पार पाडत सरांनी आपल्यातील कार्यकर्ता जिवंत ठेवला. याच कारणाने सर अनेक सामाजिक आणि राजकीय संस्थांशी जुळून राहिले. त्यांच्या सोबत काम करत राहिले आणि आजही त्यांचे सामाजिक कार्य अविरत सुरूच आहे. सरांचे वाचन प्रचंड, चिंतन अविरत, बोलण्याची निष्णात शैली, विषय समजावून सांगण्याची अद्भुत कला यामुळे सर अनेक ठिकाणी भाषणाला जातात, नव्हे तर आयोजक त्यांच्या तारखांची

संजय गोडघाटे
मो. 9623345452




वाट पाहतात आणि सन्मानाने निमंत्रण देतात. सर जेव्हा भाषण द्यायला उभे होतात. तेव्हा सारा सभागृह कान लाऊन त्यांचे शब्द नी शब्द मनात साठवून घेतात. नि:शब्द होऊन एकाग्र चित्ताने ऐकतात. सारा सभागृह सरांच्या प्रबोधनपर भाषणाने भारावून जातो. इतके सरांचे भाषण प्रभावी आणि अभ्यासपूर्ण असते. उगाच जावेद पाशा सरांना ‘मुलुख मैदानी तोफ’ म्हटल्या जात नाही. जावेद पाशा सर कवीच नाही, लेखकच नाही तर ते उत्तम अभिनय देखील करतात. सरांनी सुरुवातीच्या काळात नाटकात सुद्धा अभिनय केलेला आहे. पण अलीकडे त्यांच्या वाढत्या व्यापामुळे सर अभिनायपासून अलिप्त झालेत. जावेद पाशा सरांनी कथा, नाटक आणि वैचारिक लेखनपण केलेले आहेत. या सर्व साहित्याची पुस्तक रूपाने आज पर्यंत चाळीस पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. संवेदनशील कवी, उत्तम कथाकार आणि चिंतनशील वक्ता अशी सरांची आज महाराष्ट्राला अमीट अशी ओळख झालेली आहे. वक्ता म्हणून त्यांचे दौरे अजूनही सुरूच आहेत. प्रबोधनाची ही चळवळ सरांनी आपल्या जीवनात, रक्तात एकजीव करून घेतली आहे. जावेद पाशा सरांनी आजपर्यंत सहा राज्यस्तरीय साहित्य संमेलनाची अध्यक्षस्थानाने भूषाविली आहेत. सर स्वतः अनेक कार्यक्रमाचे, साहित्य संमेलनांचे आणि कवी संमेलनांचे आयोजक राहिलेले आहेत. महाराष्ट्रभर शेकडो व्याख्याने सरांनी दिलेली आहेत आणि देत आहेत. मध्ययुगीन सुफी संतांचे विचार, इस्लामचे समतावादी विचार, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीआई फुले, फातिमा शेख, छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची जनमानसात ‘पेरणी’ करण्याचे काम जावेद पाशा सर करताहेत. त्यांच्या जीवन जगण्याचे हेच उद्दिष्ट आहे. सरांचे हे लोकाभिमुख कार्य असेच सुरू राहील यात शंकाच नाही. सरांना सामाजिक कार्य करण्यासाठी आणि लेखन कार्यासाठी उत्तम आरोग्य लाभो हीच मंगल कामना.

*‘मंजिल मिल ही जाएगी*
*भटकते ही सही*
*गुमराह तो वो है*
*जो घरसे निकलतेही नहीं.’* ■ ■

## सहवास

### अनंतायन



अॅड. अनंत खेळकर
मो. 9370061677

प्रेमाचा केवळ एवढाच अर्थ नाही की, मुलाची कोणी मैत्रीण आहे किंवा मुलीचा कुणी मित्र आहे तर प्रेमाचा अर्थ असा आहे की, ती व्यक्ती तुमच्यासाठी खूप खास आहे. दोघांनाही एकमेकांवर विश्वास असून दोघेही एकमेकांची काळजी घेतात. `प्यार से बड़ी चाहत क्या होगी ?, प्यार से बड़ी इबादत क्या होगी ? जिसे सच्चा प्यार मिल जाए, उसे जिंदगी से शिकायत क्या होगी ? `मनापासून प्रेम करणारी अशी चोरी करणारी व्यक्ती असते जी, जी डोळ्यांतून आसवे, चेहऱ्यावरील चिंता, मनातील निराशा आणि आयुष्यातील दुःख बेमालूमपणे चोरून नेते. जर त्याला शक्य झाले तर ती व्यक्ती तळहातांच्या रेषांतून मृत्यूलाही चोरून नेण्याची तयारी ठेवते. खरे प्रेम ते नव्हे जे प्राप्त करण्यासाठी धडपड केली जाते. खरे प्रेम हे सौंदर्यावर नव्हे तर मनावर केले जाते. कुणाच्याही मनावर अधिराज्य करायचे असेल तर स्वतःच्या व्यक्तिमत्वाला त्या योग्यतेचे बनवावे लागते. खरं प्रेम हे खळखळून वाहणाऱ्या झऱ्यासारखे शुद्ध असते. जर त्यामध्ये वासनेची घाण मिसळली तर ते गढूळ होऊन झऱ्याचे रूपांतर गटारात होते. जर प्रेमाचा सुगंध मिसळला तर त्याला गंगाजलाचे पावित्र्य प्राप्त होते. म्हणून त्याग, समर्पण आणि मर्यादेचे पालन आवश्यक असते. खऱ्या प्रेमाच्या सानिध्यात सुख, समाधान, शांती आणि आनंदाची ऊधळण होते. ज्यांनी एकमेकांवर निस्सीम प्रेम करणारी व्यक्ती वेळप्रसंगी असे देखील म्हणते की, `तुझ्या प्रेमापेक्षाही मला तुझी प्रतिष्ठा महत्वाची आहे. जर गोष्ट तुझ्या चारित्र्यावर कुणी शंका घेत असेल तर, मी तत्काळ एखाद्या अनोळखी व्यक्तीसारखी तुझ्या पासून दुर निघून जाईल’ जरी ते एकमेकांपासून देहाने दूर गेले तरी मनाने मात्र सतत एकमेकांच्या काळजात श्वासांप्रमाणे दरवळत राहतात. तेव्हा कधीकधी आठवणींची एखादी सुंदर झुळूक आली की ओठांवर या ओळी आपसूकच रूंजी घालतात साखर झोपेतील गुलाबी रेशमी सुंदर स्वप्नांसारखा होता तुझा तो हवाहवासा वाटणारा सहवास. भलेही आपली साथसंगत थोडी होती पण त्यामध्ये अमृताची गोडी होती. म्हणूनच जर निघुन गेलेल्या क्षणांनी विचारले की तुला काया हवे ? तर ऊत्तर असेल पुन्हा तोच सुखद सहवास. ■ ■

बहुजन सौरभ

# जगात पुस्तकप्रेमी ओळख असणाऱ्या आंबेडकरांनी मनुस्मृतीची जाहीरपणे होळी का केली?




डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 25 डिसेंबर 1927 रोजी महाड सत्याग्रहा दरम्यान मनुस्मृतीची जाहीरपणे होळी केली होती, कारण या ग्रंथात जातीभेद आणि अस्पृश्यतेला समर्थन देणारे नियम होते. ही कृती सामाजिक विषमतेविरुद्धच्या लढ्याचा एक महत्त्वाचा भाग होती, ज्यात त्यांनी जातीभेदाचे समर्थन करणारी विचारधारा नाकारली आणि समान हक्कांसाठी लढा दिला. त्याच भारतीय समाजात मनुस्मुर्ती आजही जिवंत आहे. काही लोक आज ही विचार करतात. डॉ. बाबासाहेबांनी मनुस्मृतीचे दहन का केले? जातीभेदाचा निषेध मनुस्मृतीमध्ये जन्मावर आधारित वर्णव्यवस्था आणि जातीभेद यांना मान्यता दिली होती, ज्याचा डॉ. भिमराव आंबेडकर यांनी तीव्र विरोध केला होता. अस्पृश्यतेचा अंत हा ग्रंथ अस्पृश्यतेला कायदेशीर आणि धार्मिक आधार देत होता, त्यामुळे आंबेडकर यांनी तो जाळून अस्पृश्यता नष्ट करण्याचा संकल्प जाहीर केला. समान हक्कांसाठी त्यांना हिंदू समाजात सर्वांना समान अधिकार मिळावेत, ज्यात मंदिरे, विहिरी आणि शिक्षणाचे समान हक्क समाविष्ट होते, अशी त्यांची भूमिका होती. मनुस्मृती जाळणे हा मनुस्मृतीतील विचारांना आणि तत्कालीन ब्राम्हणी वर्चस्वाला विरोध दर्शवणारा एक क्रांतिकारक क्षण होता, समतावादी विचारांचे भारतीय नागरिक 25 डिसेंबर 1927 हा दिवस ‘मनुस्मृती दहन दिन’ किंवा ‘समानता दिन’ म्हणून साजरा करतात. या घटनेने आंबेडकरांना दलितांचे नेते म्हणून स्थापित केले आणि सामाजिक न्यायाच्या लढ्यात एक मैलाचा दगड ठरला. हे कृत्य ‘मनुस्मृती’ (मनुचे कायदे) या धार्मिक ग्रंथाच्या प्रती जाळून (बहिष्कृत) आणि शोषित समाजावरील अत्याचाराचे प्रतीक म्हणून होते. आज राज्यात देशात मनुवादी विचाराचे लोक सत्ताधारी आहेत. लोकशाहीच्या चारी स्तंभावर त्यांची भक्कम पकड आहे. ‘लोकशाहीची ताकद प्रत्येक स्तंभाच्या ताकदीवर आणि स्तंभ एकमेकांना कसे पूरक आहेत यावर अवलंबून असते. 1) संसद म्हणजेच कायदेमंडळ, 2) सरकार कार्यकारी मंडळ, 3) न्याय पालिका - न्यायालय, 4) मीडिया किंवा प्रेस. वर्तमानपत्राला लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हटले जाते. मात्र ते खरे नसून लोकशाहीत फक्त, लोकसभा, न्यायपालिका व नोकरशाही हे तीनच स्तंभ मानले जातात. त्यामुळे ते लोकशाहीचे स्तंभ नसून राजकीय पक्षांचे आधारस्तंभ झाले आहेत. टीव्ही वरील विविध मालिका पाहिल्यावर तुम्हाला वाटते काय मनुस्मृती संपली? रंग माझा वेगळा ही मालिका काळ्या रंगाच्या स्त्रीवर आधारित आहे, त्यातील गोऱ्या रंगाची सौंदर्य इनामदार तिच्या जाती धर्माला शोभेल अशीच वागताना दाखविल्या जाते, मध्येच उच्चशिक्षित स्पेशेलिस्ट डॉ. मुलगी तनुजा मंत्री येते आणि काय काय करते, दिपाची आई व बहीण कोणत्या नीच पातळीवर कुटुंबात सतत कट कारस्थान करते. म्हणजेच रामायण महाभारतातील स्त्रियांच्या नायिका खलनायिकाची नव्याने ओळख निर्माण करून वर्णव्यवस्था आजच्या स्त्रियांवर लादण्यासाठी या मालिका आहेत काय? एका बाजूला स्त्री शिकली प्रगती झाली सांगायचे दुसरीकडे तिला देवा धर्माच्या जोखंडात बंदिस्त कशी राहील त्यांची व्यवस्था करावी तिच्याकडून रीतिरिवाजाच्या नांवा खाली उत्सव साजरा करून घ्यावे या मागचे षडयंत्र बहुजन समाजातील महिलांनी समजून घेतले पाहिजे. असे असतांना त्याचं स्त्रिया जास्त संख्येने संध्याकाळी सात ते रात्री साडेनऊ पर्यत टीव्हीवरील मालिका लक्षपूर्वक पाहतात. भारतीय स्त्रीयांना युगांयुगाच्या तरुंगात ठेवणारी व्यवस्था म्हणजे जातीव्यवस्था त्याची आचारसंहिता म्हणजे मनुस्मुर्ती होती आणि आज ही ती भारतीय समाजात मनुस्मृती जिवंत आहे. त्या नुसार स्त्रीयांना आर्थिक अधिकार अथवा आर्थिक स्वातंत्र्य नाकारणारी व्यवस्था म्हणजेच मनुस्मुर्तीचे अलिखित कायदे होते. स्त्रीयांच्या सामाजिक श्रमावर पुरुषाची मालकी असावी असे ती सांगते होती. ज्या मनुस्मुर्ती उच्चजातीय स्त्रीला घराच्या बाहेर श्रम करण्यास नाकारत होती. तीच उच्चजातीय स्त्री आज सर्व ठिकाणी आघाडीवर दिसते. ज्या उच्चजातीय लोकांनी मनुस्मुर्तीचे समर्थन केले होते. तेच आज त्याचा जास्त लाभ घेताना दिसतात. टीव्ही सीरियल प्रबोधन करणारी मालिका वरून विचारते ‘आई कुठे काय करते? मध्ये उच्चशिक्षित बापच बाहेर संजना सोबत ऑफिसच्या नांवावर शेण खातो, संजनाचे शेखरशी अधिकृतपणे लग्न होऊन मुलगा असतांना ही ती अनिरुद्ध बरोबर लग्न करण्यासाठी आटापिटा करते. या संघर्षातून कुटुंबात तयार होणारा मानसिक शारीरिक तणाव म्हणजेच काय संदेश देण्याचा उद्देश या मालिकेच्या दिग्दर्शकांचा असतो. भारतात सर्व ठिकाणी महिलांचे आजचे स्थान पहिले तर मनुस्मुर्ती जिवंत नाही. असे वाटते. पण बहुजन समाजांच्या घराघरातील व्यवहार सण, उत्सव डोळसपणे पाहिल्यास महिलांचे धार्मिक सन उपास तापास आणि मंदिरातील बहुजन समाजांच्या महिलांची उपस्थती पाहिली कि मनुस्मुर्ती जिवंत आहे हे स्पष्ट दिसते. महिलांची शिक्षणातील आणि नोकरी धंद्यातील प्रगती पाहली तर मनुस्मुर्ती जिवंत नाही असे वाटते. पण जेव्हा बँका, सरकारी कार्यालय, रेल्वे. शाळा कॉलेज मधील सुशिक्षित महिलांना नवरात्रात नऊ दिवस नऊ रंगात पाहिल्या जातात तेव्हा मनुस्मुर्ती जिवंत दिसते. सिनेमा, नाटक, टिव्ही मालिका मध्ये जेव्हा महिला नायिका, खलनायिका पाहल्या जातात तेव्हा महिलांनी मनुस्मुर्ती नाकारलेली दिसते. पण जेव्हा देवाच्या आशीर्वादाने मुल झाले किंवा प्रगती झाली, संकट टळले हे दाखविल्या जाते तेव्हा मनुस्मुर्ती महिलाच्या मेंदूत कायम कोरली आहे हे दिसते. ‘सुख म्हणजे नक्की काय असते?’ असे विचारणारी आणखी एक टीव्ही सिरीयल मालिका त्यामध्ये शालिनी, देवकी, कोण कोणते कारस्थान करून गौरीला कलंकित करण्याचा प्रयत्न करतात, जोतिकाला जयदीप आवडतो आणि जय दीप गौरीचा बालपणाचा मित्र आहे, त्यात जिव्हाळा आपुलकी प्रेम आहे असे दाखवते, माईसाहेब दादासाहेब यांचा फक्त नांवाला दरारा असतो. घरातील नीच पातळीवरील कटकारस्थानाची त्यांना कल्पनास नसते म्हणजेच वडीलधाऱ्यांना या मालिका मूर्खात काढून महिलांना कोणती प्रेरणा देणाऱ्या आहेत. पहिल्या सारखी कडक मनुस्मुर्ती आज कुठे आहे असे म्हणणारे लोकच अशा वेगवेगळ्या मालिका जिवंत करून मनुस्मृती आचार संहिता कायम स्त्रीयाच्या मेंदूत राहण्याचे काम अनेक प्रकारे करीत असतात. ब्राम्हणी साहित्यिक विचारवंत कसे बेमालूम पद्धती त्यांचे कलम कसाई कौशल्य वापरतात याचे ठळक नांवे नरहर कुरुंदकरांच्या ‘मनुस्मुर्ती काही विचार’ या पुस्तकाचे परीक्षण कॉम्रेड शरद पाटील यांनी केले त्यावेळी त्यांनी या सर्व बुद्धी प्रामाण्यवादी ब्राम्हणाची यादीच दिली आहे. (संदर्भ सत्यशोधक मार्कसवादी जुले ऑगस्ट 1983) आंबेडकरी चळवळीतील लोक वगळता इतर मराठा, ओबीसी मागासवर्गीय बहुजन समाज मनुस्मुर्तीच्या चौकटीत बंधिस्त आहे. मराठा, ओबीसी बहुजन समाज किंवा इतर पुरोगामी संस्था संघटना पक्ष 25 डिसेंबर मनुस्मुर्ती दहन दिन साजरा करीत नाही. काही जयभिम कॉमरेड असलेले कार्यकर्ते त्यात हिरीरीने भाग घेतात. 25 डिसेबर भारतीय महिला दिवस म्हणून जाहिर व्हावा अशी मांगणी 1996 साला पासुन केली जाऊ लागली. डॉ. प्रमिला संपत यांनी पुढाकार घेउन सर्व प्रथम चंद्रपूरच्या दीक्षाभूमीवर विकास वंचित दलित राष्ट्रीय महिला परिषद झाली होती. त्यात ही मांगणी झाली त्या नंतर बाळासाहेब (प्रकाश) आंबेडकर प्रणित संस्था संघटना करीत आहेत त्याला पुढे रिपब्लिकन महिला आघाडी ने 25 डिसेंबर हा भारतीय स्त्रीमुक्ति दिन म्हणून जाहिर व्हावा अशी मांगणी केली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 25 डिसेंबर 1927 रोजी महाड येथे सत्याग्रह केला होता. त्यात मनुस्मुर्ती, श्रूती स्मृती, पुरणाला स्पष्ट नाकारून त्याचे दहन करण्याचा ठराव करण्यात आला होता. हा ठराव विनायक सहस्त्रबुद्धे यांनी मांडला आणि राजभोज यांनी त्याला पांठिबा दिला. मनुस्मुर्ती दहनाचा ठराव झाल्या नंतर रात्री नऊ वाजता एका खड्यात अस्पुश्य बैराग्याच्या हस्ते मनुस्मुर्तीची जाहिर होळी करण्यात आली. या महाड च्या सत्याग्रह यशस्वी करण्यात ज्यांनी जीवापार मेहनत घेतली ते सर्व शांताराम पोतनीस, केशवराव देशपांडे, रा. वामनराव पत्नी, कमलाकर टिपणीस, पुण्यावरून सुभेदार घाडगे, रा. थोरात. ही मंडळी होती या सर्व बाबासाहेबाच्या सच्च्या अनुयानी त्याचे जोरदार समर्थन केले म्हणून यांच्या स्त्रिया शिक्षण नोकरीत सर्व ठिकाणी आघाडीवर आहेत पण त्या आज मनुस्मुर्ती चे दहन दिन साजरा करीत नाही. सर्व ठिकाणी मनु ने नकारलेले अधिकार घेतात आणि योग्य ठिकाणी मनुस्मुर्तीच्या इतर धार्मिक कायदे कलमाचा काटेकोर अंमल करतात. त्यामुलेच भारतात मनुवादी संघटना पक्ष वाढत आहेत. डॉ. बाबासाहेब यांनी मनुस्मुर्तीचे जाहिर दहन केले होते. ते केवळ महिलाच्या मुक्तिसाठी आज महिला मुक्त आहेत पण डॉ. बाबासाहेब आंबेडकर याचे ते अभ्यासपूर्ण परिश्रम आणि त्याची अंमलबजावणी करीता केलेला संघर्ष महिला विसरल्या आहेत. बहुजन समाजातील लोक किती ही फुले, शाहु, आंबेडकर यांची नांवे घेऊन जयजयकार करीत असली तरी त्यांनी खरी विचारधारा स्विकारली नाही. हे त्यांच्या आचरणातून दिसून येत आहे. मराठा ओबीसी मागासवर्गीय एकूण बहुजन समाज म्हणजे 85 टक्के मागासवर्गीय समाज जो विविध जाती आणि पोट जातीत विखुरला आहे. तो सुशिक्षित होऊन पुढे गेला असे दिसत असले तरी त्यांचावर हजारो वर्षाचे बंदीस्त करणारे संस्कार तो विसरायला तर नाही. विज्ञानाने किती प्रगती केली असली तरी तो स्वतःला त्या बंधनातून मुक्त भरारी घेण्यास तयार नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ती 25 डिसेंबर 1927 ला महाड येथे जाहीर पणे होळी करून मनुस्मृती जाळ्ली असली तरी 2017 मध्ये तिची नवीन मराठी आवर्ती पेशवा सरकारच्या आशीर्वादाने बाजारात खुले आम विकली गेली. आणि ते घेणारे बहुसंख्य बहुजन मागासवर्गीय समाजातील सर्व प्रकारचे लोक होते. त्याला पुरोगामी समाजवादी, राष्ट्रवादी यांनी दाखविण्या पुरता विरोध केला. त्यात आंबेडकरी चळवळीतील सुशिक्षित लोक पण मागे नाहीत. ते मनुस्मुर्ती माहिती करीता, अभ्यास करण्यासाठी विकत घेतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ती जाळ्ली म्हणजे ती बहुजनांच्या विकास, कल्याण, अधिकार नाकरणारी होती म्हणुन जाळ्लीनां. मग आपण डॉ. बाबासाहेबांनी लिहलेल वाचले पाहिजे. म्हणजे आपणास योग्य दिशा मिळेल. म्हणूनच बहुजन समाजातील सर्व मागासवर्गीय जातीजमातील सर्व पुरुष महिलानी मनुस्मुर्ती दहन का केले. यांचा इतिहास वाचावा तर खऱ्या अर्थाने स्त्री मुक्ती होईल. टीव्ही चॅनलवर असा मालिका येणार नाहीत. तर सहकुटुंब सहपरिवार, फुलाला सुंगन्ध मातीचा, मुलगी झाली हो! या सर्व मालिकांनी बहुसंख्य महिलांना मोहित करून ठेवले. बॉब कट केस ठेऊन, जीन पॅन्ट टी शर्ट घातले म्हणजे स्त्री मुक्त आहे. असे समजणे मूर्खपणाचे लक्षण आहे.

आज सर्व क्षेत्रात मुक्तपणे ती नोकरी, धंदा, कला कौशल्य दाखवीत असली तरी ती लैंगिक, मानसिक, आर्थिक दृष्ट्या धर्म संस्काराच्या बाहेर जात नाही. गुरुवार शुक्रवार सह सर्व रिती रिवाज योग्य वेळी काटेकोर पणे त्यांचे पालन करते म्हणुन तीला, बॉब कट, जीन पॅन्ट टी शर्ट घालण्याची विशेष सवलत मिळते आहे. म्हणुन ती मोठ्या प्रमाणात मनुस्मुर्ती दहन दिन साजरा करीत नाही. बहुजन समाजात मागासवर्गीय जाती जमातीत वैचारिक प्रबोधन होणे गरजेचे आहे. म्हणुन बहुजन समाजात मनुस्मुर्ती आज भी जिवंत आहे. मराठा समाजात मराठा सेवा संघाने प्रचंड वैचारिक प्रबोधन केले. मग त्यांच्या महिला मनुस्मुर्ती दहन कार्यक्रम घेतात का? (माफ करा या बाबत मला माहिती नाही, कधी वाचले, आणि पाहिले नाही) मग कोणत्या स्त्रीया त्यांच्या संघटना मनुस्मुर्ती दहन दिवस साजरा करतात? सर्वच भारतीय समाजातील स्त्रीयांनी मनुस्मुर्ती दहन दिन म्हणून साजरा करायला पाहिजे. तर ती वैचारिक दृष्ट्या संपेल. अन्यता ती केवळ बहुजन समजतच नाही तर सर्व भारतीय समाजात जिवंत राहील. आणि प्रज्ञा ठाकूर, साध्वी असूनही खासदार बनून संसद भवनात जाईल. मनुवादी मनुस्मृती वर्णव्यवस्था किती महत्वपूर्ण होती हे सांगेल. जगात पुस्तक प्रेमी म्हणून ओळख असणाऱ्या आंबेडकरांनी मनुस्मृतीची जाहीरपणे होळी का केली? ही सांगेल काय ? ■ ■



सागर रामभाऊ तायडे
9920403859

# वंचितांना अनंत शुभेच्छा...

**नुकताच स्थानिक स्वराज्य संस्थांचा निकाल लागला. निवडणुकीपूर्वी आरोप प्रत्यारोपांच्या फैरी विविध राजकीय पक्षांकडून झाडल्या गेल्या. त्यांना या निकालाने पूर्णविराम मिळेल असे वाटत होते. पण ज्यांना टीकाच करायची आहे. त्यांनी आपला स्वभाव गुण सोडला नाही. प्रस्थापित राजकीय पक्षांना अशा आरोप प्रत्यारोपांची सवय झाली आहे. कारण व्यवस्थेतील खाचखळगे आणि मुक्तपणे चरण्याचे कुरण त्यांना माहीत आहेत. भ्रष्टाचाराच्या दिशेने जाणाऱ्या महामार्गावर त्यांची नेहमीच वर्दळ राहिली आहे.**

निवडणूक अशाच आरोप प्रत्यारोपाने ते लढत असतात. ‘शंभर खोके एकदम ओके, ‘काय झाडी काय डोंगर’ तर तिकडे साखर कारखाना आणि अलीकडचाच जमीन घोटाळा सर्वज्ञात आहे. हे सारे पचवून ढेकरही न येऊ देता किंवा आली तर जाणवू न देता राजकारणात पाय घट्ट करून उभे आहेत. अशा राजकारण्यांना काही लोक ‘मुरब्बी’ वगैरे म्हणतात. कारण त्यांच्याकडे प्रचंड पैसा आहे. त्यामुळे निवडणुकीत साम, दाम, दंड अशा तिहेरी शस्त्रांसह हे लोक निवडणूक लढतात. कोकणात एका पक्षांच्या राणेने दुसऱ्या पक्षाच्या राणेचे पैसे पकडले. त्या पैशाचे काय झाले? त्या तक्रारीचे काय झाले? असे अनुत्तरीत प्रश्न जनतेच्या पुढे आहेत. पण त्या प्रश्नांची कधीही उत्तरे मिळाली नाहीत आणि मिळणारही नाहीत. शेवटी धानदांडग्यांचा विजय झाला. भाजपाच्या वळचणीला उभे असलेल्या पक्षांचा विजय झाला. भाजपा प्रथम क्रमांकाचा पक्ष तर शिवसेना शिंदे गट दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष ठरलेला आहे.

या सर्व मोठ्या पक्षांच्या निकालाची सर्वत्र चर्चा असतांना वंचित बहुजन आघाडीने प्रकाश आंबेडकरांच्या नेतृत्वात बऱ्यापैकी यश मिळविले आहे. या निवडणुकीत अनेकांना आपल्या क्षेत्रातील राजकीय अस्तित्व टिकवता आले नाही. अशात वंचित बहुजन आघाडीला मिळालेले यश दखलपात्र आहे. उबाठा, मनसेला लोकांनी नाकारल्याचे हे निकाल सांगतायत. मनसेला तर खातेही उघडता आले नाही. उबाठाला आणि काँग्रेसला तसेच शरद पवार गटाला मिळालेली मते त्यांच्या राजकीय अस्तित्वाला स्थिरता देणारे नाहीत. हे सर्व एकमेकांच्या मदतीने लढले. परंतु प्रकाश आंबेडकरांनी आपला राजकीय प्रवास एकट्यानेच रेटला. प्रकाश आंबेडकरांची ही, ‘एकला चलो रे, भूमिका अनेकांना आवडली नाही. काँग्रेसच्या तंबूतील तथाकथित आंबेडकरवाद्यांना तर प्रकाश आंबेडकरांची भूमिका कधीच आवडली नाही. पण प्रकाश आंबेडकरांनी कोणाच्याही टीकेला न जुमानता आपला राजकीय प्रवास सुरूच ठेवला आणि तो प्रवास यशाच्या दिशेला जाऊन मिळाला. अद्याप अधिकृत आकडेवारी उपलब्ध झाली नसली तरी 104 नगरसेवक आणि 5 नगराध्यक्ष निवडून आल्याची सोशल मीडियावर चर्चा आहे. ही आकडेवारी खरी असेल तर वंचित बहुजन आघाडी मनसे आणि उबाठापेक्षा मोठा पक्ष आहे, हे निश्चित झाले आहे. वंचित बहुजन आघाडी आता महापालिकेच्या निवडणुकांवर लक्ष केंद्रित करून आहे. परंतु नुकत्याच हाती आलेल्या निवडणुकांचे निकाल बघता महाविकास आघाडीत बिघाडी झालेली आहे. ठाकरे बंधू एकत्र आल्याने शरद पवार गटाने मैत्रीचा हात मागे घेतला. तर काँग्रेसही एकटी पडली. येणाऱ्या महापालिका निवडणुकीत काँग्रेसला अस्तित्वाच्या सीमारेषा कायम करायच्या आहेत. पण हे काम वाटते तितके सहज सुलभ नाही. त्यामुळे काँग्रेसने थोडी मवाळ भूमिका घेतल्याचे दिसते आहे. येणाऱ्या महापालिका निवडणूकीत काँग्रेसला वंचितची साथ हवी आहे आणि त्या दिशेने बैठकांनाही सुरुवात झाल्याचे समजते आहे. लोकसभा निवडणुकीत जागावाटपावरून काँग्रेसने वंचितला खूप बदनाम केले होते. त्यानंतरच्या यशाने काँग्रेसला विधानसभेत वंचित मित्र म्हणून फार महत्त्वाचा वाटला नाही. विधानसभेत दानादान झाल्यानंतरही काँग्रेसला उबाठा, शरद पवार गट तारेल असे वाटले. परंतु स्थानिक स्वराज्य संस्थेत काँग्रेसची शिलाई चौफेर उसवली आणि आता ही शिलाई पक्की करायची तर वंचितकडे मैत्रीचा हात पुढे केल्याशिवाय पर्याय नाही, काँग्रेसला हे कळून चुकले. युद्धात आणि प्रेमात सर्व काही माफ असते. पण सध्या राजकारणातही सर्व काही माफ असते असेच सर्वत्र चित्र आहे. लोकसभेच्या वेळी तत्कालीन काँग्रेस श्रेष्ठी नाना पटोले यांचा पूर्ण हवेत गोळीबार होता. आता तसे होता कामा नये. काँग्रेसचे आंबेडकरवादाच्या विरोधात अनेक ऐतिहासिक पुरावे आहेत. त्यामुळे काँग्रेस आणि आंबेडकरवाद ही अनैसर्गिक मैत्री किंवा युती आहे असे वाटते. तरी अशा मैत्रीने किंवा युतीने, एक दुसऱ्यांच्या सहकार्याने राजकीय स्थिरता मिळत असेल, अशा सहकार्यामुळे सत्तेच्या दालनात ही पाऊलवाट जात असेल तर डोळसपणे अशा मैत्रीचा आंबेडकरावादी विचार करतीलच असा विश्वास वाटतो. युती झालीच तर काँग्रेसनेही युती टिकविण्यासाठी मते मागताना आणि मते देताना प्रामाणिक राहायला पाहिजे. कारण 1998 च्या रिपब्लिकन ऐक्यात चिमूर लोकसभा क्षेत्र प्रा. जोगेंद्र कवाडे साठी सोडण्यात आला होता. अल्पावधीत सरकार कोसळल्यामुळे लगेच वर्षभरात पुन्हा निवडणुकीला सामोरे जावे लागले. चिमूरक्षेत्र परत कवाडेंना मिळाले. यावेळी विधानसभा आणि लोकसभा निवडणूक एकाच वेळी पार पडल्या. यावेळी कवाडेंचा 70000 हजार मतांनी पराभव झाला 2004 मध्ये कवाडे 98 हजार मतांनी मागे पडले. पण चिमुरक्षेत्रातील काँग्रेसचे चार आमदार निवडून आले. निवडून आलेल्या चार आमदारांना मिळालेल्या मतांची बेरीज केली तर त्यावेळेस त्या बेरजेत प्रा. कवाडेंचा विजय होता. पण कवाडेंना निवडून आणताना लगेच त्यांची जात, धर्म आणि पक्ष आडवे आले. त्यामुळे काँग्रेसच्या त्या आमदारांनी एक मत स्वत:साठी म्हणजे विधानसभेसाठी आणि एक कवाडेंसाठी म्हणजे लोकसभेसाठी अशी मते मागायची होती. पण एक मत स्वत:साठी आणि दुसरे मत भाजप उमेदवारासाठी मागितले आणि काँग्रेसने कवाडेंचे राजकारण संपविले. चिमूर लोकसभा क्षेत्रात कवाडे परत निवडून आले असते तर त्यांनी तिथूनच उमेदवारी मागितली असती. मग त्या क्षेत्रातील काँग्रेसच्या उमेदवारांनी कुठे जायचे हा ही पेच त्यावेळी काँग्रेस पुढे उभा राहिला असावा. त्यामुळेही कवाडेंना पाडण्याशिवाय काँग्रेसकडे उपाय राहिला नसावा. कवाडे पाठोपाठ सर्व रिपब्लिकन नेत्यांना काँग्रेसने युती धर्म न पाळल्याने घरी बसावे लागले. प्रकाश आंबेडकरांना काँग्रेसची ही नीती समजली होती. त्यामुळे त्यांनी काँग्रेससह प्रत्येक वेळी दबावाचेच राजकारण केले.




भूतकाळ असा फांदपितुरीचा असला तरी सांप्रत स्थितीत एकमेकांच्या खांद्यावर हात ठेवून चालायची वेळ आहे. त्यामुळे जात धर्म आणि पक्ष आपल्या मैत्रीच्या आड येणार नाही ही दक्षता काँग्रेसने घ्यायला हवी. कारण प्रकाश आंबेडकरांचे राजकारण जात धर्माच्या पलीकडचे आहे. त्यांनी अशा संकुचित विचारांना थारा दिला नाही. नुकत्याच पार पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत निवडून आलेले उमेदवार हे फक्त बौद्ध किंवा महार नाहीत. आंबेडकरांनी सत्ता वाटताना कुणाची जात पाहिली नाही. तर प्रत्येकांना कसे प्रतिनिधित्व देता येईल याचा विचार केला आहे. काँग्रेसलाही असा विचार करता आला तर भविष्यात राजकीय चित्र निश्चितच वेगळे असेल. आंबेडकरवादी जनता सन्मानपूर्वक मैत्रीसाठी कायम तयार आहे.



राजू बोरकर
मो. 7507025467

वंचित बहुजन आघाडी म्हणजे ‘संशयकल्लोळ’ नाही, तर शिस्त आणि संयम यांची गाठ आहे. प्रकाश आंबेडकर यांच्याकडे नेहमीच संशयाच्या चष्म्यातून बघणाऱ्यांनी या यशाचे वस्तुनिष्ठ विश्लेषण करावे. जे आताही आपला चष्मा बदलायला तयार नाहीत ते आंबेडकरी विचारांचे खरे मारेकरी आहेत. आंबेडकरी राजकीय चळवळ दुबळी, मरतुकडी करण्यात अशाच चष्मेबहादरांचा मोठा वाटा आहे. या चष्मेबहादरांना न जुमानता प्रकाश आंबेडकरांनी आपला राजकीय प्रवास सलग सुरू ठेवला. त्यामुळे रस्त्याच्या कडेला उभा असलेला दुर्लक्षित वंचित या प्रवासात सहप्रवाशी झाला. त्यामुळेच हे खऱ्या अर्थाने वंचितांचे यश आहे. निवडून आलेल्या सदस्यांनी गुलाल आणि नीळ उधळून विजयाचा मुकूट डोक्यावर ठेवून नाचण्यात धन्यता मानू नये. वंचितांनी तुमच्यावर जबाबदारी सोपविली आहे. या जबाबदारीतून पळ काढू नका. ज्या वाटेवर तुम्ही उभे आहात ती वाट विधान भवन आणि संसदेकडे जाते. या वाटेवर पडलेली तुमची पावले ठसा उमटवणार आहेत. ही पाऊलखून आता कोणीही पुसून काढणार नाही याची काळजी घेणे क्रमप्राप्त आहे. आता मतमोजणी संपली आहे. यापुढे मान सन्मानाची मोजणी सुरू झालीय. जे आत्मसन्मानासाठी झगडत राहतात त्यांनाच मानसन्मान मिळतो.

डॉ. बाबासाहेबांनी शासनकर्ती जमात बनण्याचे स्वप्न दिलेत. त्याला अनेक वर्ष उलटून गेलीत. एकीकडे काँग्रेस भाजपाच्या दऱ्या, सतरंज्या उचलणारा गट आणि दुसरीकडे ‘तख्त बदल दो. ताज बदल दो बेइमानो का राज बदलदो’ म्हणत आत्मसन्मानासाठी लढणारा गट अशा दोन गटात समाजाची विभागणी झाली आहे. त्यामुळे प्रत्येक घरात नेत्यांची गर्दी झालीय. पण भिंतीवर गिरवायची अक्षरे तशीच राहिलीत. वंचितांच्या शिस्तीत ‘राज’ बदलण्याची सुरुवात झालीय. ज्या खुर्चीवर आपण बसणार आहोत ती खुर्ची व्यवस्था बदलण्यासाठी दिलेली संधी आहे, हे प्रत्येकांच्या लक्षात आसले पाहिजे. यानंतर कोणी कितीही उपरोधिक टोले मारले तरी संयमाने वागा. लहानशी महत्त्वाकांक्षा बाळगणे हा अपराध आहे. म्हणून स्वप्न कायमची मोठी असली पाहिजेत. पसरट असली पाहिजेत. मुंबई दिल्ली दूर आहे. पण रोज अशी स्वप्न पाहा. त्यासाठी वेडे व्हा. ती स्वप्ने तुम्हाला तिथपर्यंत घेऊन जातील. शिवसेनेतून बाहेर पडलेल्या राज ठाकरेंनी काही काळ जादू केली. पण आता तो जादूचा दिवा विझला आहे. मुख्यमंत्रीपद भोगलेले उद्धव ठाकरे आज कुठे आहेत? राजकारणाचा बाप माणूस शरद पवार आज कुठे आहेत? लहान भाऊ, मोठा भाऊ अशा तुलनेत असणारा भाजपा कधीकाळी केवळ दोन खासदारांचा पक्ष होता. आज देशावर राज्य करतोय. इथपर्यंत यायला 40/42 वर्षांचा दीर्घ प्रवास भाजपाला करावा लागला. राजकारणात कुणीही स्थिर नाही हेच यावरून दिसून येते. त्यामुळे शिस्तबद्धता आणि दूरदृष्टी ही असलीच पाहिजे. गुलामांना सत्तेची स्वप्न पडत नाहीत. म्हणून दुसऱ्या पक्षांच्या सतरंज्या अंथरणाऱ्या आणि उचलणाऱ्या गटाला शुभेच्छा आणि ‘बेईमानोंका राज बदल दो...’ असे म्हणत यश मिळविणाऱ्या वंचितांनाही अनंत कोटी शुभेच्छा....! ■ ■

# दैनिक बहुजन सौरभ 6 व्या वर्षाकडे वाटचाल...



स्वाभिमानाचे स्मरणशिल्प -४१

## समतेचे अग्रदूत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा पहिला गाव जिल्हा भंडारा.

भंडारा जिल्ह्यातील पहिला गाव महामार्ग मुख्य रस्तावर आहे. मध्यभागी भागातील आकर्षणाचे केंद्र आहे. परिसरातली दाटीवाटीने वस्ती असल्यामुळे येणारे जाणारे लोक मोठ्या प्रमाणात येतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मानणारा प्रत्येक माणूस या ठिकाणी येऊन नतमस्तक होतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना दिनविशेष कार्यक्रमात अभिवादन करतात.

संवाद मित्र, कपिल नारनवरे
मो. 9370773608


















## निधन वार्ता

### ज्ञानेश्वर हिम्मतराव धोटे



**नागपूर :** झिंगाबाई टाकळी येथील रहिवासी ज्ञानेश्वरराव धोटे यांचे बुधवारी प्रदिर्घ आजाराने निधन झाले. मृत्युसमयी ते 77 वर्षाचे होते. त्यांचे अंतिम संस्कार दिनांक 25 डिसेंबर रोजी गुरुवारी सकाळी 10 वाजता. मानकापूर घाटावर करण्यात येणार आहे.

### नानासाहेब विठ्ठलराव चिटमुलवार



**नागपूर :** रवींद्र नगर प्रताप नगर येथील रहिवाशी आर्मी रिटार्यड आर्किटेक्ट श्री नानासाहेब विठ्ठलराव चिटमूलवार यांचे आज दि. 24 डिसेंबर रोजी दुःखद निधन झाले. मृत्युसमयी त्यांच वय 89 होते. त्यांच्या पश्चात दोन मुले डॉ. विकास व प्रशांत, दोन मुली सौ. अल्का व सौ. सीमा व बराच मोठा आप्त परिवार आहे. राहत्या घरून अंतिम यात्रा गुरुवारी 25 डिसेंबर रोजी अंतिम संस्कार सहकार नगर घाटावर आहे.

### सुधाकर पटवर्धन



**नागपूर :** माद्यजी सैनिक व वन विभाग कार्यरत निर्मल कॉलनी नारा नागपूर निवासी सुधाकर वसंतराव पटवर्धन यांचे निधन झाले. ते 53 वर्षाचे होते. त्यांच्यावर नारा घाटावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

### श्री सुरेशचंद्र सूर्यवंशी



**नागपूर :** महाल नागपूर येथील रहिवासी सुरेशचंद्र सूर्यवंशी यांचे दुःखद निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय 85 वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी, एक मुलगा, तीन मुली व जावई व बऱ्याच मोठा आप्त परिवार आहे. त्यांच्यावर गंगाबाई घाट येथे अंतिम संस्कार करण्यात आले.

### सुमनबाई घनश्यामजी बैगने



**नागपूर :** अवधुत नगर नं. 2 नागपुर निवासी श्री निलेश / कमलेश बैंगने (न्यूज पेपर वाटणारे) यांच्या आई श्रीमती सुमनबाई घनश्यामजी बैंगने, वय 79 वर्ष यांच बुधवारी 24 डिसेंबर रोजी वृद्ध अवस्थेमुळे निधन झाले. मानेवाडा घाटावर अंतिम संस्कार करण्यात आले, त्यांच्या मागे 2 मुले, 4 मुली व बराच मोठा आप्त परिवार आहे.

## नाताळ सण साजरा सेवा कार्याचा सत्कार

**नागपूर :** ख्रिस्त मंडळाच्यावतीने आयोजित नाताळ सण साजरा करण्यासाठी आयोजित केलेल्या सभेत मान्यवराचे सत्कार करण्यात आले. 25 डिसेंबर 2025 रोजी आयोजित येशू ख्रिस्त जयंती निमित्त राठोड लॉन माणकापूर रोड येथील सभेत सुरवातीला येशू ख्रिस्त यावरील विविध मधुर गाणी संगीत चमुनी वाद्यवृंद सहित सादर केली. पास्टर नितीन सरदार यांनी येशू यांच्या जीवनकार्यावर दीर्घ असे मंत्रमुग्ध व्याख्यान दिले. ॲड. रॉजर गायकवाड यांच्या अनुपस्थित त्यांचा उपदेशात्मक संदेश वाचून दाखविला.उपस्थित पास्टर यांनी येशू भक्तिपर बाइबल मधील प्रेम, शांति, शक्ती, क्षमा यावरिल वचने वाचून दाखवली.







त्यानंतर समाजातील मान्यवरचा शाल आणि मानचिन्ह देऊन सन्मान केला. डॉ. सुनिल भगत, प्रधान सचिव, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, प्रीती नगरारे सिकलसेल रुग्णसेवा, डॉ. प्रकाश वाकोडे आणि इतर वीस मान्यवरचा सत्कार केला.

प्रसंगी बहुजन सौरभ मुख्य संपादक डॉ. ॲड. सिद्धार्थ कांबळे, संध्या राजूरकर, विलास गजभिये तसेच महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य सदस्य रामभाऊ डोंगरे, गौतम पाटील, अविनाश सुखदेवे, देवयानी भगत, विजय बोरघाटे, सुनीता बोरघाटे आणि बहुसंख्येने नागरिक

## 25 डिसेंबर स्त्री मुक्ती दिन उत्साहात साजरा

**नागपूर :** 25 डिसेंबर 1927 ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मनुस्मृतीचे जाहीर रित्या दहन केले. पुस्तकांवर जीवापाड प्रेम करणाऱ्या, पुस्तकांच्या सहवासात रमणाऱ्या, पुस्तकांसाठी घर बांधणाऱ्या, पुस्तक वाचतांना देहभान विसरून जाणाऱ्या बाबासाहेबांनी मनुस्मृती या पुस्तकाला जाहिररित्या जाळले म्हणजे हे पुस्तक किती विकृतीने भरलेले असेल याची आपल्याला कल्पना येते. या पुस्तकात स्त्रिया आणि बहुजनांना गुलामीत ठेवण्यासाठी अतिशय घृणास्पद विधाने केली आहेत. जातीच्या नावावर बहुजनांना शुद्र, अतिशुद्र लेखून त्यांना अमानविय वागणूक देण्याची व्यवस्था धर्माच्या नावाखाली मनुस्मृतीने हजारो वर्ष भारत देशात राबवली होती. भारतातील स्त्रिया आणि बहुजनांवर जुलमी अत्याचाराची व्यवस्था राबविण्याचे आदेश देणाऱ्या मनुस्मृतीचे दहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले होते म्हणून 25 डिसेंबर हा दिवस आम्ही स्त्री मुक्ती दिन म्हणून साजरा करतो. या दिवशी अमोली मैत्रेयी संघाच्या वतीने गेल्या चार वर्षांपासून महिलांच्या बाईक रॅलीचे आयोजन कॉटन मार्केट येथील सावित्रीमाई यांच्या पुतळ्यापासून संविधान चौक इथपर्यंत काढण्यात आली. या रॅलीला महिलांचा अतिशय उत्तम प्रतिसाद मिळाला. यात 1950 पुर्वी भारतातील स्त्रियांची परिस्थिती ही रोहिणी दहिवले यांनी विषद केली, 1950 नंतर संविधानामुळे महिलांना मिळालेल्या अधिकारांची माहिती प्रतिभा मोटघरे यांनी दिली, अमोली मैत्रेयी संघाच्या कार्यप्रणाली बदल माहिती रंजना सुरजुसे यांनी दिली. प्रास्ताविक शमा मनवर, संचालन दक्षीता रामटेके आणि आभार प्रदर्शन श्वेता रंगारी यांनी केले. कार्यक्रमासाठी आरती हनवते, राजेश्री रामटेके, माया खोब्रागडे, विजया सोनडवले, छाया उके, वैशाली गोस्वामी यांनी सहकार्य केले.



## बसपाचे गाडगेबाबांना अभिवादन




**नागपूर :** सर्वसामान्यांचे प्रबोधनकार, स्वच्छतेचा संदेश देणारे, वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविणारे राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या 69 व्या स्मृतिदिना निमित्त बहुजन समाज पार्टीचे प्रदेश महासचिव मंगेश ठाकरे, माजी प्रदेश प्रभारी डॉ. कृष्णाजी बेले, प्रदेश मीडिया प्रभारी उत्तम शेवडे, जिल्हा प्रभारी रंजना ढोरे यांनी मेडिकल चौकातील गाडगेबाबा धर्मशाळा परिसरातील गाडगेबाबांच्या पुतळ्याला माल्यार्पण करून अभिवादन केले. गाडगे बाबांचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर असीम प्रेम होते. त्यांच्या निधनाची बातमी कळताच गाडगेबाबांनी अन्न व पाणी त्यागुन स्वतःला एका खोलीत बंद करून घेतले. 20 डिसेंबर रोजी स्वतःचे प्राण त्यागले अशा प्रकारची माहिती बसपा नेत्यांनी याप्रसंगी दिली. याप्रसंगी प्रामुख्याने संगीतबाबू इंगळे, सदानंद जामगडे, अभय डोंगरे, नरेश गायकवाड, नितीन वंजारी, विकास नारायणे, ॲड. मिलिंद खोब्रागडे, धनराज हाडके, विलास पाटील, संभाजी लोखंडे, प्रेम पाटील, मंगेश पगारे, दिलीप गजघाटे, जगदीश गेडाम, हेमंत बोरकर, नरेंद्र सोनडवले, अरुण शेवडे, शिवसिंह ठाकूर, रमा इंगळे, भानुदास ढोरे आदि प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित होत.

## सावित्रीबाई फुले सार्व. वाचनालय येथे 3 जानेवारीला कार्यकर्ता मेळावा



**अकोला :** जुना आरटीओ रोड, किर्तीनगर, येथील सावित्रीबाई फुले सार्वजनिक वाचनालयात 3 जानेवारी 2026 रोजी दु. 2 वाजता ग्रंथालय वाचक व तालुका स्तरीय ग्रंथालय कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन केले आहे. तसेच ज्ञानवर्धिनी प्रश्न मंजुषा स्पर्धेचे आयोजन केले होते. त्याचा बक्षीस वितरण सोहळा व विजेत्या स्पर्धकांना पारितोषीक व प्रमाणपत्राचे वाटप देखिल करण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी साहित्यिक प्रा. शेखर कोरडे राहणार असून प्रमुख उपस्थितीमध्ये डॉ. अतुल पुं. वानखडे (जिल्हा ग्रंथालय अधिकारी, अकोला), प्राचार्य प्रशांत जानोळकर (सचिव स्व. ज्योती जानोळकर इंग्लीश स्कूल, अकोला), डॉ. एस. आर. बाहेती, ज्ञानदेवराव भदे, प्रा. डॉ. बाबाराव सावजी, प्रा. डॉ. रोहिणी तडस, राजेश डांगटे (अकोट), ॲड. प्रमिला वानखडे, शिला घरडे पाटील (लेखिका) उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमामध्ये ग्रंथमित्र प्रभाकरराव घुगे (सदस्य राज्य ग्रंथालय परिषद, म. रा.), शामराव वाहुरवाघ (सदस्य ग्रंथ निवड समिती, महाराष्ट्र राष्ट्र मुंबई), रामभाऊ मुळे उत्कृष्ट कार्यकर्ता ग्रंथमित्र पुरस्कार प्राप्त) यांचा सत्कार करण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे आयोजन प्रा. डॉ. श (अध्यक्ष), प्रा. डॉ. देवयानी नेमाडे (उपाध्यक्षा), डॉ. शुभांगी उके (सचिव) व समस्त कार्यकारी मंडळ यांनी केले आहे.




## निशा खापरे यांच्या 'आयुष्याची नवी पहाट' काव्यसंग्रहाचे प्रकाशन

**नागपूर :** काव्यप्रेमी शिक्षक मंच आयोजित 16 वे साहित्य संमेलन 21 डिसेंबर ला भंडारा येथे संपन्न झाले. याप्रसंगी नागपूरच्या सुप्रसिद्ध कवयित्री निशा खापरे यांच्या 'आयुष्याची नवी पहाट' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन झाले आहे. काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा संमेलनाध्यक्ष प्रदीप दाते सर ( विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष), उद्घाटक राजा धर्माधिकारी, स्वागताध्यक्ष दीपक सपकाळ यांचे हस्ते पार पडला. यावेळी प्रमुख अतिथी राजेंद्र फंड, काव्यप्रेमी शिक्षक मंचाचे राज्याध्यक्ष आनंद घोडके, सचिव कालिदास चवडेकर, कोषाध्यक्ष कृष्णा शिंदे सर तसेच समस्त राज्यसमिती पदाधिकारी, नागपूर विभाग पदाधिकारी, नागपूर जिल्हा पदाधिकारी यांची विशेष उपस्थिती होती.'आयुष्याची नवी पहाट' या काव्यसंग्रहाला महाराष्ट्रातील प्रथितयश कवी, लेखक व समीक्षक डी.बी. जगत्पुरिया याची अभ्यासू प्रस्तावना असून सुप्रसिद्ध ब्लर्बमास्टर मा. प्रभाकर तांडेकर 'प्रदत्त' यांनी काव्यसंग्रहाची आस्वादनपूर्ण पाठराखण केली आहे. पुणे येथील साहित्यिक राजन लाखे यांची प्रोत्साहनपर शुभेच्छा लाभली आहे. अविशा प्रकाशनाची निर्मिती सर्वांगसुंदर आहे; हे विशेष!

## बुद्ध विहार समन्वय समितीची वार्षिक सर्वसाधारण सभा

**नागपूर :** बुद्ध विहार समन्वय समितीची वार्षिक सर्वसाधारण सभा 20 डिसेंबर रोजी सम्यक बुद्ध विहार खामला येथे अशोक सरस्वती बोधी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. इंजि. ए.के. पाटील सचिव यांनी सभेपुढील विषयाला सुरवात केली. त्यानुसार मागील सभेचे इतिवृत्त वाचन केले व मागील वर्षाचा कार्य अहवाल सांगितला. धेनूत्तम बोंबर्डे यांनी मागील वर्षाचा अंकेक्षण अहवालचे वाचन केले व पुढील वर्षासाठी तयार केलेले अंदाजपत्रक सांगितले. इंजि. ए. के. पाटील यांनी पालि भाषा परीक्षेचा अहवाल सांगताना यावर्षी एकूण 7325 विध्यार्थी परीक्षेला बसले असुन 12 जिल्ह्याचे आकडे उपलब्ध झालेले नसल्यामुळे हा आकडा 10000 पर्यंत जाईल जपानी भाषेची माहिती देताना ते म्हणाले. यावर्षी 7 डिसेंबरला पुणे येथे परीक्षा झाली. त्याचा निकाल जानेवारी महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात लागेल.

सिद्धार्थ खोब्रागडे यांनी मॅरेज ब्युरोचा मेळावा रविवारी 21/12/25 ला आयोजित केला आहे ही माहिती दिली. बुद्ध विहाराचे तिसरे राष्ट्रीय अधिवेशन 28 फेब्रुवारी व 1 मार्च 26 रोजी उल्हासनगर येथिल टाउन हॉल येथे आयोजित केले आहे. अध्यक्षाच्या परवानगीने येणाऱ्या विषयात महत्वाचा मुद्धा लोखंडे यांनी मांडला कि अधिवेशन यशस्वी करण्यासाठी 20 समित्या निर्माण कराव्या ज्यात 4-4 लोकांचा सहभाग राहील आणि त्यावर एक केंद्रीय पदाधिकारी देखरेख ठेवेल व रिपोर्ट घेईल मुंबईची टीम काम करेलच व त्यांना ही टीम मदत करेल.

शेंडे यांनी मुद्दा मांडला कि ज्यांचेकडे रक्कम शिल्लक आहे ती मिळविण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. जांभुळकर म्हणाले कि, परीक्षेचे उत्तरपत्रिका 6 वर्षाच्या साचलेल्या आहेत. त्याबद्धल काय करावे तर त्यावर निर्णय होऊन फक्त मागील वर्षीच्या ठेवण्यात याव्या आणि उर्वरित नाहिश्या कराव्या असा ठराव मंजूर झाला. या सभेत मागील वर्षी कोषाध्यक्षाचे कार्य सांभाळल्याबद्दल विस्तारि वाघमारे व या वर्षी त्यांचा कार्यभार सांभाळण्यास परवानगी देऊन सभेत अंकेक्षण अहवाल सादर केल्याबद्दल त्यांच्या अभिनंदनाचा ठराव अध्यक्ष्याच्या सहमतीने पारित करण्यात आला. अध्यक्षीय पदावसरून अशोक सरस्वती यांनी सभेला मार्गदर्शन केले. सभेचे आभार प्रदर्शन प्रा. आनंद भालेराव यांनी केले. ए. के. पाटील यांनी सभा समाप्त झाल्याची घोषणा केली. त्यानंतर उपस्थिताना अल्पोपहार देण्यात आला. सभेच्या यशस्वीतेसाठी प्रा. धाबर्डे, धेनुत्तम बोंबर्डे, आनंद वासनिक, दिलीप बागडे, पुंडलिक गायकवाड आणि ए. के. पाटील यांनी सहकार्य केले.

## दूसरे महायुद्ध आणि डॉ. आंबेडकर या नाटकाचे उत्तर नागपुरात यशस्वी सादरीकरण

**नागपूर :** युद्ध हे कधी कधी अनिवार्य असले तरी, युद्ध हे कोणत्याही समस्येचे अंतीम उत्तर नाही. आणि समाधान नाही. जगाला युद्ध नको, बुद्ध हवाय, बुद्धाचा शांतीचा आणि अहिंसेचा मार्या हवाय, या मार्गाने गेले तरच मानवी समाजाची उन्नती आहे. हा विचार पेरणारे, अव्दितीय नाट्यानुभव देणारे 'दुसरे महायुद्ध आणि डॉ. आंबेडकर1 हे नाटक उत्तर नागपुरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल कन्व्हेंशन सेंटर 'येथे प्रचंड गर्दीच्या प्रतिसादात दिनांक 7 डिसेंबर 2025च्या सायंकाळी सादर झाले ॲड. विमलसूर्य चिमणकर यांच्या पुस्तकावर आधारित या नाटकाचे लेखन , सिद्धहस्त नाटककार श्री. प्रभाकर दुपारे यांचे होते तर तितक्याच ताकदीचे कल्पक दिग्दर्शन श्री. प्रमोद भुसारी हे होते.

या नाटकाची निर्मीती आणि सादरीकरण डॉ. बाबासाहेव आंबेडकुरनैशनल असोसिएशन ऑफ इंजिनिअर्स (बनाई) यांचे होते तर आयोजन सहयोग डॉ. बाबासाहेब बँकर हेल्थ ऑर्गनायजेशन (बाहो) यांचा होता.

प्रदोगाचे सुरवातीस उत्तर



नागपूरचे आमदार, माजी मंत्री माननीय डॉ. नितीन राऊत तथा सेवानिवृत अतिरिकत मूखसचिव श्याम तामडे तथा अनिल हिरेखण गोंडवाना विद्यापीठाचे कुलसचिव त्यांनी दीप प्रज्वलन तथा बाबासाहेबांच्या प्रतिमेस अभिवादन किमी त्यावेळी 'बानाईने'अध्वस अरविंद गेगम तथा इतर पदाधिकारी, जयंत इंगळे, विजय खापर्डे, भास्कर खोब्रागडे प्रदिप नगरारे, तसेच बाहोचे अध्यक्ष डॉ. संजय रामटेके, डॉ. सतिश बागडे, डॉ. जांभुळकर आणि, इतर पदाधिकारी उपस्त्रीन होने. संचालन, बाणाईचे इंजि. निकेश नाखमे होते.

प्रेशकांच्या उस्फूर्त प्रतिसादर झालेला नाटकातील, हे दृश्ये, प्रकाश योजना वो पश्याने प्रेसकांच्या डोळ्यांचे पारणे फिटले. या नाटकात डॉ. आंबेडकरांची भूमिका आर्किटेक्ट प्रथमेश वळीवकर यांनी केली, नेपथ्य, प्रमोद भुसारीयांनी केले होते तर अत्यंत जमेची बाजू असलेली वेशभुषा डॉ. सुचित्रा भुसारी यांची होती. नाटकास चारुदत जीचकार यांचे संगीत लाभले होते. प्रकाश योजना- शिवशंकर माळोदे यांनी केली होती

तर रंगभूषा - बाबा खिरेकर यांची होती दूसरे महायुद्ध आणि डॉ. आंबेडकर या नाटकाया अद्वितीय प्रवेश, नामपूर उत्तर नागपुरात होत आसल्याबाबत आयोजक आणि सादरकर्तांचे अभिनंदन केले. डॉ. बाबासोहेब आंबेडकर यांची 'महायुद्धातील भूमिका' समस्त वानवजातीचे कल्याण करणानी होती आणि देशाला सिंचन स्वातंत्र्य मिळवून देण्यास महत्वाची होती त्याबाबत ऋष्टा व्यक्त केले.

## चला आपला बहुजन सौरभ बलशाली करू या!

आपल्या बहुजन समाजातील महापुरुषांच्या विचारांवर आपण सर्व क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यांच्या जयंती निमित्त आपण वैयक्तीक अथवा मित्रांच्या/ संस्था/संघटनेची शुभेच्छा जाहिरात स्वरूपात देऊन दैनिक बहुजनसौरभला आर्थिक सहकार्य करावे!

वर्तमानपत्रात बातम्या, लेख, कथा, कविता हवे असते तसेच जाहिराती गरजेच्या असतात हे लक्षात घेऊन आपण आपल्या कुटुंबातील सदस्याचे जयंती-स्मृतीदिन, वाढदिवस, सण, उत्सव, व्यवसाय, उत्पादने इत्यादी अनेक बाबतीत आपल्या समाजातील उद्योजक व व्यवसायिक यांनी जाहिरात देऊन किंवा जसे शक्य आहे तसे आर्थिक मदत केली तरच आपण आपलाच मिडीया बलशाली करू शकतो!




मुख्य संपादक, दैनिक बहुजन सौरभ

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. **RNI No. MAHMAR 2020/84035** Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648